## प्रकरण तिसरे

।। "माणसं" मधील आशय व अभिव्यक्तीची वैशिष्टये ।।

## प्रकरण तिसरे

## ।। "माणसं" मधील आशय व अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये ।।

आपण मागील दोन प्रकरणात "ललित गद्याचे स्वरूप व मराठी ललित गद्याचा वाङ्मयीन स्थूल आढावा" आणि दुस-या प्रकरणात "अनिल अवचटांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेतला·

या प्रकरणात अनिल अवचटांच्या ललित गद्य लेखनातील वैशिष्ट्ये "माणसं" या पुस्तकातून आशय व अभिव्यक्तीदृष्टया कशी आविष्कृत झाली आहेत, याचा विचार करणार आहोत·

### मुखपृष्ठ, शीर्षक, रेखाचित्र यातून लेखकाच्या जाणिवेची सूचना :-

"माणसं" या पुस्तकानेच अनिल अवचटांना ललित लेखक म्हणून खूप प्रसिध्दी दिली· या पुस्तकामधील पाचही लेख सन १९७४ ते १९७८ या कालावधीत खालीलप्रमाणे लेखाचे नाव व कालक्रमानुसार प्रसिध्द झालेले आहेत·[१]

"माणसं" - मौज दिवाळी, १९७४

"कोण माणसं···कोण जनावरं" - मौज दिवाळी, १९७५

"वस्त्या माणसांच्या" - मौज दिवाळी १९७६

"अनिकेत" - मौज दिवाळी १९७७

"अंधेर नगरी निपाणी" - पुरोगामी सत्यशोधक, मार्च १९७८

मौज प्रकाशनने हे पाचही लेख एकत्र करून "माणसं" या पहिल्या लेखाचेच नाव पुस्तकाला देऊन १९८० मध्ये हे पुस्तक प्रसिध्द केले·

## मुखपृष्ठ :-

"माणसं" या लेखसंग्रहाचे मुखपृष्ठ व आतील रेखाचित्रे श्री·सुभाष अवचट यांनी रेखाटली आहेत· मुखपृष्ठावर आणि मलपृष्ठावर भटक्या माणसाचं, त्याच्या संसाराचं चित्र आहे· चित्रात खाली मान घालून "माणूस" नावाच्या प्राण्याच्या संसाराचं ओझं घेऊन निघालेले गाढव हे जनावर, त्याच्या सोबत इमाने-इतबारे चालणारा, माणसाच्या संसाराला, त्याच्या भाकरीला जागून संरक्षण देणारा कुत्रा आहे· गाढवाच्या पाठीवर लादलेल्या माणसाच्या संसारात आहे एक गाठोडे, मातीचे एक मडके आणि प्रकाशासाठी लोंबकळणारा कंदील, खुडूकमुडूक संसार चालवण्यासाठी बाळगलेल्या कोंबडया, संसार वहाणा-या गाढवावर असलेली त्याची मुले असावीत आणि स्वतः हा माणूस हातात उंच काठी घेऊन, या गाढवामागून संसार ओढत असताना, वहात असताना दिसतो· खांद्यावर त्याची छोटी निष्पाप मुलगी आहे आणि चालता चालता क्षणभर थांबून तो आपल्याच संवेदनशील बांधवाकडे, वाचकाकडे, मोठया आशेने पहातो आहे····

## शीर्षक :-

"माणसं।" उद्‌गारवाचकासह, असे हे शीर्षकच माणसांचे, वाचकांचे कुतूहल चाळवते, प्रश्नचिन्ह बनते· "माणसं" हा लिखाणाचा विषय होऊ शकतो का ? आज विज्ञानयुगात "माणसांच्यावर" लिहिले जाते, याने नाही म्हटले तरी वाचक स्मितित होतो· आपल्याच सभोवताली जगणा-या आपल्या बांधवांकडे लक्ष कसे गेले नाही याचे आश्चर्य वाटून, माणसांना "माणसं" वाचायला, समजावून घ्यायला लावण्यात अवचट शीर्षकातच यशस्वी होतात·

## रेखाचित्रे :-

"माणसं" मधील बेचाळीस रेखाचित्रे, मोठया समर्पकतेने योग्य त्या ठिकाणी सुभाष अवचटांनी रेखाटलेली आहेत· दुस-याच रेखाचित्रात पाठीशी मूल बांधलेली त्याची पत्नी सोबत चालताना दिसते, तर काही रेखाचित्रात पोतराजासारखा भटका व पाठीवर तीन ढेपा वहाणारा हमाल मध्यमवर्गीय, शहरी वाचकाला नक्की परिस्थितीचे चित्र समजण्यासाठीच ती रेखाचित्रे रेखाटली असावीत· मोज प्रकाशनानेही आवश्यक ठिकाणी या रेखाचित्रासाठी संपूर्ण पान खर्ची टाकले आहे· त्यामुळे पुस्तक सुबक, सुलभ झाले

12226
A

आहे. अवचटांच्या लेखनाला या रेखाचित्रांनी सामर्थ्य दिले आहे.

**"माणसं" ची अर्पण पत्रिका :-**

"समाजाने ज्यांना
भटकंती बहाल केली
त्या सर्व उप-यांना
अपराधी भावनेनं
अर्पण........."[२]

या अर्पणपत्रिकेमधून अवचटांचा रोख या देशातील परंपरागत विषम समाजरचनेवर आहे. माणसांमधील माणूसपणाला शोभणार नाही अशी भटकंती, दारिद्र्य, उपरे, मागासजीवन या खालच्या थरातील माणसाच्या वाट्याला आणलेले आहे, यासाठी जबाबदार असणा-या उच्च समाजाचा मी स्वतः एक घटक आहे. ही अपराधीपणाची जाणीव लेखकाला होताना दिसते. त्या जाणीवेपोटीच, आपण स्वतःला माणूस म्हणवत असू, तर या दुष्टचक्रात सापडलेल्या प्रचंड मानवसमूहाला आपण समजावून घेतले पाहिजे ही त्यांची भूमिका "माणसांचा" शोध घेणा-या त्यांच्या या ललित लेखनाची आहे हे स्पष्ट होते.

**प्रस्तावना :-**

"माणसं"साठी श्री.नानासाहेब गोरे यांची प्रस्तावना लाभली आहे. "वस्ती नं. १२ " च्या नानासाहेबांच्या लिखाणावरून "माणसं"च्या या वस्त्यांविषयी त्यांनीच प्रस्तावना लिहिणे हे अधिक योग्य आहे, अशी अवचट व प्रकाशक अशा दोघांचीही धारणा आहे आणि ती अगदीच रास्त आहे. प्रस्तावना नानासाहेबांनी इंग्लंडमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम करत असताना लिहिली आहे. त्याच वेळी मराठवाड्यात नामांतर आंदोलनाने उसळलेल्या दंगलीच्या बातम्यांनी ते कमालीचे दुःखी झाले आहेत, एकापरीने स्वतःवर उद्विग्न झाले आहेत, दंगलीमुळे नानासाहेबांच्या उद्ध्वस्त झालेल्या मनांच्या छटा सर्व प्रस्तावनेत पसरलेल्या दिसतात. प्रस्तावनेच्या उत्तरार्धात ते लेखकाच्या लिखाणाकडे, त्याच्या भूमिकेकडे वळताना दिसतात.

असे असले तरी ही दोन्ही "मने" एकाच भूमिकेवर "मानवतेच्या कल्याणाच्या" एकाच दिशाने जाणारी आहेत. दंगलीच्या बातम्यांनी गुदमरलेल्या, अस्वस्थ झालेल्या नानासाहेबांना माणसावरील त्यांचे स्वतःचे किंवा अवचटांचे लिखाण हे नुसत्या विचारांच्या थप्प्या वाटू लगातात, हे लिहून, मांडून काय उपयोग असे नैराश्य त्यांच्या मनात दाटलेले दिसते, किंवा जाती-जमातीबद्दलचे लिखाण चविष्टपणे लिहून त्या जाती-जमातीची फसवणूक तर आपल्याकडून होत नाहीना, असा त्यांना प्रश्न पडतो.

या प्रश्नांनिशी ते दलितांची जागी झालेली अस्मिता, विद्रोह, नकार, शिक्षण आणि विज्ञान तंत्रज्ञान यांमधून निश्चित मानवसमूहाची दुःखे नष्ट होतील या विचाराने त्यांच्या मनाला उभारी येते.

प्रस्तावनेच्या निमित्ताने नानासाहेबांच्या संवेदनशील मनाने एक विचार-मंथन मांडले आहे. त्यामुळे पुस्तकातील अवचटांच्या लेखाविषयी, समस्यांविषयी लिहिणे तसे कमीच झाले आहे.

अवचटांनी लिहिलेल्या कामगार वर्गाविषयी सहानुभूती व्यक्त करून त्यांचे आर्थिक न्यायासाठी संघटन झाले पाहिजे व कामगार वर्गाचे सांस्कृतिक प्रबोधन झाले पाहिजे, त्यासाठी यंत्रयुगाची शिस्त व संस्कृती आपण निर्माण केली पाहिजे ही त्यांची धारणा आहे.

अवचटांनी जो दुर्लक्षित जातीजमाती, कामगार यांच्या जीवनाचा वेध घेण्याचा जो प्रयत्न केला आहे त्याची प्रशंसा ते करतात. अवचटांची भाषा, लेखनशैली, परदुःख पाहून गहिवरणारे मन व सांदीकोप-यात पडून राहिलेल्या दुर्लक्षित मानवसमूहाचे मराठी वाचकाला प्रथमच दर्शन घडविणारे लेखन याबद्दल नानासाहेब प्रस्तावनेत अवचटांना मनःपूर्वक धन्यवाद देतात.

या संग्रहाची अर्पणपत्रिका व प्रस्तावना यामधून अनिल अवचट व श्री. नानासाहेब गोरे यांच्या मनातील या भटक्या जातीजमाती, सामान्य उप-या माणसांचे जगणे पाहून येणारी अपराधीपणाची भावना ही म. फुले, महर्षी शिंदे, माटे मास्तर, साने गुरुजी ते व्यंकटेश माडगूळकर यांच्या मनात, लिखाणात असलेली आढळते.

आज विसाव्या शतकातही या दुर्लक्षित जाती-जमाती, विषम समाजरचना या सनातन प्रश्नांची चर्चा करण्याची, ते मांडण्याची, त्यांना अग्रक्रम देऊन "माणूस" म्हणून सोडविण्याची गरज आहे. हे महत्त्वाचे काम अनिल अवचटांनी "माणसं" या पुस्तकामधून केले आहे.

## आशयाच्या दृष्टीने लेखन वैशिष्ट्यांचा विचार

### समाजजीवनाचा आरसा :-

"माणसं" मधील पाच दीर्घ लेख म्हणजे आजच्या समाजजीवनाचे आरसेच आहेत. आज समाजात आहेरे आणि नाहीरे अशा लोकांचाच आवाज मोठा होतो आहे. मध्यमवर्गियांचा तर जीवनाकडे, माणसांकडे पाहण्याचा संकुचितपणा पाहून अवचटांना खूप अपराधीपण वाटते. त्या अपराधीपणाच्या भावनेतून "माणसां"च्या जीवनाचा आरसा ते वाचकांसमोर ठेवतात, माणूसपणाला आवाहन करण्याचा प्रयत्न ते करत आहेत.

मध्यमवर्गीय माणसाची जीवनाची कल्पना स्वतःच्या प्रगतीपलिकडे जाऊ शकत नाही आणि मूठभर श्रीमंतांना त्याची फिकीर नाही म्हणून अवचटांना अधिक अपराधी वाटते. यामधून उपरे जीवन जगणा-या मानवसमूहांचे चित्र या पुस्तकातून वाचकांसमोर ठेवलेले आहे.

"माणसं" मधील पहिल्या लेखात माणसांचा समूह येतो, तो दुष्काळपीडीतांचा त्यांना घरदार आहे, खानदान आहे, परंतु ती माणसे परिस्थितीने पुणे रेल्वे स्टेशनवर भिकारी बनलेली दिसतात. नोकरीला जाणारा मध्यमवर्गीय त्यांना पाहून वैतागताना दिसतो. पाऊस उघडया ग्राउंडवर बसू देत नाही, रेल्वेची माणसं स्टेशनवर थांबू देत नाहीत. जुने झोपडपट्टीवाले थारा देत नाहीत. असे "उपरं" व "हकलले जाणं" हे त्यांच्या जिण्याचे सूत्र माणसांनीच बनवले आहे. ना त्यांच्याबद्दल कुणाला सहानुभूती ना त्यांच्या समस्या सोडवण्याचे भान.

लातूरच्या बाजारात घरावरचे पत्रे विकून, घराला लावायला कडीही शिल्लक नसणारे हे दुष्काळग्रस्त गवताच्या बियांच्या भाकरी करून खाताना दिसतात.

एका बाजूने दुष्काळ नैसर्गिक आपत्ती, तर दुस-या बाजूने सवर्ण मराठा, लिंगायत यांची ग्रामपंचायत निवडणूक मोठया चुरशीत. या परिसरात दलितांची संख्या अधिक, त्यामुळे ज्या पार्टीविरूध्द निकाल त्यांनी दलितांचे खून पाडले, स्त्रियांची विटंबना केली, मोलमजुरी बंद केली. अशा कोंडमा-यातून पुण्यासारख्या शहरात दुष्काळग्रस्तांची झोपडपट्टी वाढत गेलेली दिसते. हा अनिल अवचटांनी समाज निरीक्षणातून घेतलेला शोध आहे.

दुष्काळग्रस्त, जगण्याला महाग झालेल्या या माणसांच्या गलिच्छ वस्त्या उभ्या रहाताहेत तर दुस-या बाजूला मध्यमवर्गीयांच्या गणपती उत्सवाचा लखलखाट झगमगतो आहे, वस्त्यांच्यामधला अंधार वाढतो आहे. सामाजिक कार्यकर्ते गणपती उत्सवाच्या झगमगटासाठी वर्गणी गोळा करताहेत त्याचवेळी हे दुष्काळग्रस्त पुण्यात पोटासाठी भीक मागताहेत. "चारसहा महिन्यांमागे दर तासाला एखादा भिकारी यायचा, आता दर पाच मिनिटाला एक तरी भिकारी समोर उभा आहेच."[१] ही दोन पैशाचे नाणे टाकणा-या दुकानदाराची वेदना आहे. पण त्या भिका-यांची विचारपूस करावी, किंवा शहरात लातूरकडील दुष्काळग्रस्त समाजबांधव आले असून, परिस्थितीने भिकारी झालेत याचा त्याला पत्ता नाही तर बंगल्यातील श्रीमंत कागद वेचून पोट भरणा-या या दुष्काळ-ग्रस्तांना चोर ठरवत आहेत.

"कोण माणसं....कोण जनावरं..." हेच उमगू नये असे जीवनचित्र माणसांच्या वाटयाला येत आहे. जणू "माणूस" आणि "जनावर" यांची व्याख्या बदलते की काय, अशी ही समाजातील गरीब, श्रीमंत, उच्च-नीच विषमतेची दरी प्रचंड प्रमाणात रूंदावताना अनिल अवचटांना जाणवते.

नागर जीवनातील हवेलीपासून उद्यानापर्यंत हमालांचा घाम गळालेला असतो, उन्हातान्हात अनवाणी पायाने हा हमाल हातगाडी ओढीत असतो, मागून करपल्या चेहऱ्याची त्याची बायको तो गाडा ढकलत असते. त्याच रस्त्याने डोळ्याला गॉगल लावलेल्या श्रीमंतांच्या बायकांच्या गाडया जात असतात. आपल्याच समाजातील स्त्री-पुरूषांची ही दोन चित्रे, यातील श्रीमंत, उच्चवर्गीयांना "सामाजिक बांधिलकी" नावाचे जीवनात काही मूल्य आहे याची त्यांना जाणीव नाही.

गुदामाच दार उघडताच "वरच्या" मजल्यावरील बाईचा खोकून जीव जाणे आणि गुदामात काम करून टी·बी·ने खोकून जीव जाणारे, यांच्या जीवात फरक आहे· कारण या "वरच्यां"च्या दृष्टीने हमाल म्हणजे जनावर· एक मेला तर त्या जागी दुसरा येतो, ही त्या बाईची, व्यापारी, कारखानदार, रेल्वे अधिकारी §म्हणजे एक प्रकारे शासन§ यांची धारणा आहे· बारदानातल्या हमालाला घाणीत रस्त्यावर बसावे लागते, तितकेच घाण शब्द व्यापा-याचे ऐकावे लागतात, गुदामातील खाचखळग्यातून सापापासून वाचण्यासाठी स्वतः आणलेल्या मेणबत्तीचा प्रकाश निर्माण करावा लागतो· शंभर किलो ओझे उचलण्यामधून आलेली "सांधेदुखी" आपणासारख्या श्रमदान शिबीरात दोन तास काम करणा-यांना यायची नाही अशी नोंद करतानाच मेलेल्या हमालाचे क्रियाकर्म, त्याच्या कुटुंबाला मदत हे गरीब हमाल वर्गणी काढून करताना दिसतात·

"रेल्वे हमालां"च्या बाबतीत रेल्वे, व्यापारी, एजंट यांना हमाल "माणसं" आहेत असे कधी वाटत नाही· रेल्वेचा जादा चार्ज "डिमरेज" हमालाच्या पगारातून, पगार कसला हमाली, त्या हमालीतून कापतात, उलट त्याचा हातपाय मोडला तर "भरपाई" हा शब्द नाही, भरपाई द्यावी लागते ती फरशी तुटल्याची "हमाल म्हणजे जणू बेवारशीच" असा या समाजघटकांचा दृष्टिकोन आहे·

लाकडी फळ्यांनी गच्च भरलेल्या वॅगनमध्ये शिरायला इंचाचीही जागा नाही, भरणा-या रेल्वेच्या माणसांनी उतरणा-या हमालांच्या त्रासाचा विचार केलेला नाही म्हणजेच एका माणसाचा विचार दुस-या माणसाने करायचा नाही असे हे समाजजीवन बनते आहे·

सिमेंटच्या धुरळ्यात जेवणा-या हमालांना जेवायला बसायला जागा नाही· आठशे माणसे बैलाहून अधिक श्रमाची कामे करतात तिथे अर्धा इंची पिण्यासाठी पाण्याचा नळ रेल्वेने देऊ नये, शासनाच्या लक्षात येऊ नये; रेल्वे अधिका-यांना मात्र कुटुंबासह सहल करण्यासाठी मोफत पास दिला जातो· फॅक्टरींच्यामध्ये पागड्या भरून ऑफिसर्ससाठी फ्लॅट घेतला जातो, पेट्रोलसह गाडी, पार्टीसाठी एक्सपेन्स अलाऊन्स पुरवला जातो· ही सरळ विरोधी समाजचित्रे म्हणजे मानवाचा मानवासाठीचा कृतघ्नपणाच आहे· या समाजचित्रात वृत्तपत्रे ॲसिडवॅगन मध्ये बळी जाणा-या हमालांची दखल दोन ओळीपलिकडे घेत नाहीत, ना त्या हमालांच्या

श्रमाला प्रतिष्ठा, ना त्यांच्या जगण्याला माणूसपण·

हमालांच्या जीवनाचे विदारक दृश्य वाचकांसमोर मांडतानाच "शिवाजीनगर गोडावून"मधील हमालांचे होकारात्मक आनंदी जीवन आपल्यासमोर लेखक ठेवतो· कारण बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली "हमाल पंचायत" निर्माण झाली, संघटन झाले, श्रमाला साफल्य मिळाले· संघटन हे हमालांच्या बेवारशी जनावराच्या जीवनाला उत्तर होते, मार्ग होता, दिशा होती, संघटनात्मक आपल्या समस्या समाजापुढे मांडू शकतो, सामाजिक न्यायासाठी झगडू शकतो, सहानुभूतीने समजावून घेऊन काम केल्यास आनंद लाभतो· हमालांच्या कामावरील दलाल जाऊन त्यांच्या सोसायटीकडे कामकाज आले आहे. त्यामुळे काम तेवढेच पण आपलेपणा आहे, असहाय्यता नाही, दडपण नाही, कामामध्ये निर्मितीचा आनंद आहे· भजनापासून फॅसिट यंत्रापर्यंतची हमाल सोसायटीची मजल ही अनिल अवचटांना संस्कृतीची चिन्हे, माणूसपणाची धुकधूक वाटते·

"वस्त्या माणसां"च्या असलेल्या प्रचंड असुरक्षित अशा झोपडपट्टी दर्शनाने अवचट पुन्हा एकदा समाजमनाचा, रचनेचा, व्यवस्थेचा विचार करू लागतात· झोपडपट्टीशी बंगलेवाल्याचे नाते चमत्कारिक आहे, पोलिसांच्या मदतीने ते यांना कधीही उठवतील कारण त्यांच्या पडद्याच्या खिडकीतून हे घाणेरडे दृश्य दिसायला नको असते· मुंबईला ट्रॉम्बेच्या अॅटॉमिक एनर्जी केंद्राच्या अधिकारी वर्गाच्या लोकांनी कॉलनी समोरील वसाहत नाना युक्त्या योजून हलवली हे उदाहरण अवचट नमूद करतात· म्हणजेच बाहेर मध्यम-वर्गियांपासून तर अंतर्गत दादा, गुंड, यांच्यापासून या लोकांना भय असते, असुरक्षितता असते, अस्थिरता असते· या अस्थिरतेतून स्थिरतेकडे जाण्यासाठी, जगण्यासाठीचा हा अट्टहास बिचारे झोपडपट्टीवाले करताना दिसतात· ही अस्थिरता समाजरचनेतून आली आहे म्हणून आपण मानवतेतून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे, हा अवचटांचा आग्रह आहे·

अवचट म्हणतात, "झोपडपट्टी हा माणसांची जनावरे बनवण्याचा प्रचंड कारखाना आहे·"[४] इथे पोटासाठी येणारा माणूस पशुसंस्कृतीचा भाग होऊन जातो· "माणसं" हिंस्र पशू बनतात किंवा घाणीत रहाण्यात आनंद वाटणारी डुकरे ती असतात·

ही पशुसंस्कृतीच उद्या जीवन संस्कृती बनली तर मध्यमवर्गीय जगू शकणार नाही ही धोक्याची सूचना अवचट देतात. मध्यमवर्गियांनी आहे रे आणि नाही रे अशी दुटप्पीपणाची भूमिका सोडून या प्रचंड मानवसमूहाला समजावून घेतले पाहिजे.

ही सारी चित्रे, उदाहरणे म्हणजे मध्यमवर्गीय संकुचित संस्कृतीच्या जीवनाचा आरसा आहे, यातील प्रतिबिंब हे "माणूस" म्हणून लाज वाटावयाला लावणारे, शरम आणणारे आहे.

"अनिकेत" मधील भटक्यांचे जीवनमान, त्यांच्या देवदेवता, नवस सारेच अघोरी आहे. अवचट म्हणतात, "आफ्रिकेतल्या एखाद्या अज्ञात देशातले लोक तर आपण पाहत नाही ना, असे वाटते. यांच्या जीवनाची एकेक त-हा समोर उभी रहाते तेव्हा जाणवते की, दहा-पंधरा हजार वर्षांपूर्वीच्या आदिमानवाच्या काळात ही माणसे आजमितीला वावरत आहेत."[५]

या भटक्यांच्या सोबत दारिद्र्यही आहे. उत्तम गोसाव्याच्या पत्नीला नेसायला ठिगळाचे एकच लुगडे आहे तर नाचणा-या कोल्हाटणी बायांच्या जीवनात शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषणाशिवाय दुसरे जीवन नाही. या भटक्यांच्या रूपातून असंस्कृत, भयग्रस्त, अडाणी, अज्ञानी, उपरे असे माणसांचे केविलवाणे जीवन आपल्यासमोर उभे रहाते. अघोरी देवता व अघोरी उपासना यांचे प्राबल्य या समूहांवर अधिक आहे. समाजप्रवाहापासून दूर, शतकानुशतके गाढवावर लादलेला हा त्यांचा संसार, पुढच्या मुक्कामाला चालताना दिसतो.

माणूसपणाला न शोभणारे शोषण हमाल, झोपडपट्टीवासी, दुष्काळग्रस्त, भटके नि निपाणीतील तंबाखू कामगारांचे होत असताना, दुस-या बाजूला शोषकांच्या गाडयांना अतिशुध्द परदेशी पेट्रोल निपाणीत मिळते, ही एकाच समाजाची विसंगतिपूर्ण दोन टोके आहेत. या विसंगतीचे अचूक दर्शन अवचट घडवतात.

सकाळी दहा पैसे उसने घेऊन चहा पिणारे, टी.बी.सारख्या रोगाला, पठाणी कर्जाला आमंत्रण देणारे स्त्री-पुरुष तंबाखू कामगार निपाणीत घराघरांत दिसतात. अमीर शेख कामगार कार्यकर्ता, त्याचे छोटे मूल टी.बी.ने हॉस्पीटलमध्ये मरते तर डॉक्टर त्याला म्हणतात, "सव्वाशे रुपये बिल टाका, तरच प्रेत मिळेल."[६] या शेखकडे

सव्वा रुपाया नाही. त्याने आपल्या लहानग्या बाळाचे जे अवयव डॉक्टरांना हवे होते ते दिले, उरलेल्या पैशाच्या बदल्यात स्वतःचे रक्त दिले व हातात मुलाचे प्रेत घेतले. असे हे अमानुषपण भोगणारे, दारिद्र्याने गांजलेल्या अनेक अमीर शेखांचे दर्शन अवचट घडवतात तेव्हा "माणसांचे" हे आयुष्य थिजवणारे दुःख पाहून अस्वस्थता वाटते, उच्च, प्रतिष्ठित, वरिष्ठ वर्गीयांना या अस्वस्थतेचा स्पर्शही होत नाही हे कोडग्या समाजमनाचे चित्र अवचट रेखाटतात.

समाजजीवनाचे दर्शन घडवताना, या दुबळ्या माणसांच्या वस्त्या, हमाल-कामगार भटक्यांच्या जीवन व्यथा म्हणजे दिवसेंदिवस आटत जाणारा जीवनरस आणि ढासळत जाणारी परिस्थिती हे अवचटांच्या लेखाचे सूत्र झाले आहे.

निपाणीतील स्त्री-पुरुष कामगारांचे असेच अधःपतित जीवन आहे. पुरुष विडी घेऊन आला की चेकरकडून छाट विडी वाढते, याच पुरुषाची तरणीताठी स्त्री बायको-बहीण आली की विडी घेता देता हाच चेकर तिचा हात दाबतो, कधी छातीला हात घालतो. मालकाला चांगल्या स्त्रिया मिळवून देणे हा चेकरच्या डयूटीचा भाग बनतो. पुरुष कामगार सहन करण्यापलिकडे काहीच करू शकत नाही. या स्त्री-पुरुषांच्या आर्थिक मागासपणाचा, तिच्या असहाय्यतेचा फायदा हे व्यापारी, कारखानदार घेतात, माणूस म्हणून जगण्याची घृणा वाटावी, किळस यावी असे हे प्रकार राजरोसपणे चाललेले आहेत. आर्थिक शोषण, शारीरिक व्यभिचार हे आपल्या विकृत, कमकुवत, रोगट समाजमनाचे दर्शन आहे. आज प्रत्येकाला आपलेच जीवन महत्त्वाचे वाटते, इतके महत्त्वाचे की, त्यापायी आपण इतरांचे जीवन भुईसपाट करीत आहोत याची खंत करीत नाही. एकमेकांना जमेल तिथे आणि जमेल तसे ओरबडूनच आपली घरे सजवली जात आहेत. "सुसंस्कृत समाजानं वाळीत टाकलेल्या आणि मरेपर्यंत जगलंच पाहिजे एवढाच केवळ जीवनाला अर्थ उरलेल्यांची परवड "माणसं" मध्ये अचूक शब्दबध्द केली आहे. एकमेकांची शिडी करूनच स्वतःचे अस्तित्व फुलवणाऱ्या मानवसमाजाचे चित्रण म्हणजे "माणसं"[७].

असे हे खंत निर्माण करणारे विषम समाजजीवन अवचटांनी या पाच दीर्घ लेखात मांडले आहे. मध्यमवर्गीय फक्त आहे रे आणि नाही रे एवढीच, तीही अतिशय थंडपणाची भूमिका वैचारिक पातळीवर घेतो आहे. शोषित आपलेच आहेत की नाही,

त्यांच्याशी, त्या मानवसमूहाशी आपण बरोबरीच्या नात्याची काही भूमिका घेणार आहोत की नाही हे मध्यमवर्गीयांच्या कोणत्याच प्रतिक्रीयेत दिसून येत नाही· हा त्यांचा थंडपणा अस्वस्थ करतो, तर उच्चवर्गीय, श्रीमंत व्यापारी, कारखानदार हजारो कामगारांचे जीवन शोषण करणारे "ऑक्टोपस" बनत आहेत· या तीव्र प्रतिक्रियांसह समाजजीवनाचे प्रतिबिंब "माणसं" मध्ये उमटलेले आहे·

## स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांचा ध्यास :-

अनिल अवचट "माणूस" हा केंद्रबिंदू मानून त्यांच्या जीवनमूल्यांना जपणारा लेखक आहे· त्यांचे "माणसं" मधील लेखन देखील मानवी जीवनातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या जीवनमूल्यांचा ध्यास घेऊनच झालेले आहे· हा ध्यास फक्त लेखणीत नाही तर प्रत्यक्ष कृतीत जोपासला आहे· त्यामुळेच त्यांच्या लेखनात जिवंतपणा येतो· जिथे जिथे मानवी जीवनात या मूल्यांचा अभाव आढळतो तिथे तिथे अवचट व्यथित होतात· स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ज्या मानवीसमूहांना स्पर्श सुध्दा करू शकत नाही, किंबहुना तो स्पर्श त्यांना होऊ नये यासाठी बनविलेल्या स्वार्थी समाजरचनेचे, व्यवहाराचे आपण घटक आहोत म्हणून त्या मानवसमूहाचे अपराधी आहोत· या अपराधी भावनेने जीवनमूल्यांची दुर्लक्षित मानवीसमूहांसाठी प्रतिष्ठापना करावयाचा आग्रह "माणसं"च्या लेखनात अवचट धरतात·

पहिल्याच "माणसं" या लेखातील "हाकललं जाणं" "बेवारशी जिणे " हे दुष्काळग्रस्तांच्या जीवानाचे सूत्र बनू पडातेय, तेही स्वतंत्र भारतात, समतेचा अधिकार, विश्वबंधुत्वाचा घोष देणा-या, लोकशाही, राज्यघटना मानणा-या या देशात हे अवचटांना मान्य नाही·

परिस्थितीने दुष्काळग्रस्त, अज्ञानाने भटके, आर्थिक शोषणाने हमाल-तंबाखू कामगार बनलेले आपलेच बांधव, त्यांचे "माणूस" म्हणून जिवंत रहाण्यासाठीचे प्रश्न सन्मानाने, बरोबरीच्या नात्याने, सामाजिक न्यायाने सुटले पाहिजेत· त्यासाठीच लेखक निवडणुका चुरशीत लढवणा-या देशमुख पाटील यांना, गणपती उत्सवाची वर्गणी झगमगाटा-साठी गोळा करणा-या कार्यकर्त्यांना या भीक मागणा-या समाजबांधवाकडे बंधुत्वाच्या जाणीवेने पहाण्यास जागृत करतो·

दुष्काळग्रस्तांच्या वाटयाला हे "उपरं" जीवन आले म्हणून त्यांना आसरा असू नये, पिण्याचे पाणी मिळू नये· महिनोमहिने असे हे बेवारशी जीवन आपल्या सभोवताली जगावे हे सामाजिक दुःख निर्माण करणारे आहे· यांच्या सहाय्यासाठी प्रभावी अशी शासन यंत्रणा नाही याही पुढे आलेल्या अनुभवावरून या लोकांचा शासनावरच विश्वास उरलेला नाही· लेखाच्या शेवटी स्वातंत्र्य, समतेचा घोष करणा-या या शासन यंत्रणेबाबत लेखक उपहासाने आपली प्रतिक्रिया व्यक्त करतो· कारण राष्ट्रपतींना स्वच्छ, सुंदर रस्त्याने जाता यावे म्हणून रस्त्याच्या कडेला असणा-या दुष्काळग्रस्तांना रात्रीत जनावरांसारखे हाकलून लावले, खरे पहाता राज्यघटनेचे प्रमुख म्हणून त्यांची गरज या पिडीतांना होती· देशातील विषमपोडीतसमतेचे चित्र त्यांना दिसले असते, पण नोकरशहा, पोलिस आणि राजकीय पक्ष यांना कोणालाच ते नको आहे· या सर्वांचेच लक्ष आहे ते सत्तास्थानावर, पदस्थानावर अशा वेळी या बेवारशी माणसांचा विचार केला पाहिजे, त्यांची जगण्यासाठीची मानवीमूल्ये त्यांना उपलबध करून दिली पाहिजेत· दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीने गांजलेल्या माणसांना हवी आहे माणुसकी, प्रेम, बंधुत्वाची भावना आणि थोडासा आधार, भीक नव्हे· पण तेच आज माणसासाठी दुर्मिळ झाले आहे· या मूल्यांअभावीच झोपडपट्टी वाढण्यात दुष्काळग्रस्तांची भरच पडली आहे·

"कोण माणसं····कोण जनावरं··" मधील हमालांच्या व्यावसायिक, कोटुंबिक, सामाजिक जीवनाचा आलेख काढताना अनिल अवचट स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या जीवनमूल्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात आणि लेखकाच्या वाटयाला मोठा विषाद येतो· "कोण माणसं···कोण जनावरं" यांच्या फरकातील स्पष्ट सीमारेषा पुसट व्हाव्यात, विरघळाव्यात, इतके हृदयविदारक चित्र समोर येते·

उच्चवर्गीय श्रीमंत, मध्यमवर्गीय यांचे जीवन फुलवणारी हमाल नावाची जनावरे राबराबत असताना दिसतात आणि वरच्या थरातले त्याला जास्तीत जास्त अधिक धारदारपणे ओरबडाताना दिसतात·

राबून खाणाऱ्या हमालाचा हात मोडला, पाय मोडला नव्हे तो मेला तरी "भरपाई" हा शब्द कुठल्याच यंत्रणेत नाही· वृत्तपत्रातील दोन ओळींपेक्षा त्याच्या मृत्यूला, जीवनाला किंमत नाही· मग जीवनमूल्ये तर दूरच राहिली· स्वतःच्या स्वार्थापोटी एजंट, व्यापारी, कारखानदार आणि शासन जबाबदारी झटकताना दिसतात·

या राबणा-या बेवारशी जनावरांचा जीवनमूल्यांवर अधिकार आहे· ती त्यांची गरज आहे, ती त्यांना मिळाली पाहिजे· यासाठी एखादा बाबा आढाव "हमाल पंचायत" स्थापन करतो, त्याबरोबर माणुसकीचे वारे फिरू लागते· कामाचे तास, कामाप्रमाणे वेगवेगळे दर, श्रमाला ब-यापैकी मजूरी, दलाली नाही, कामात निर्मितीचा आनंद उपलब्ध झाला म्हणजेच स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या जीवनमूल्यांचा मानवी मनाला स्पर्श झाला तरी तो फुलतो हे स्पष्ट झाले· त्यांच्या प्रश्नांची तीव्रता कमी होऊ शकली· जागृत झालेली ही हमाल पंचायत या जीवनमूल्यांच्या लढाईत झोपडपट्टी प्रश्नांसाठीच्या मोर्चात सहभागी झालेली दिसते· धरणग्रस्तांसाठी धरणे, सत्याग्रहींना जेवण पुरविणे, बाबा आढावांच्या "एक गाव - एक पाणवठा"साठी भ्रमंतीचा खर्च हा हमाल पंचायतीने चालविणे म्हणजे इतरांच्या न्यायासाठी झगडण्याचा जो एक ध्यास पाहिजे, वृत्ती पाहिजे आणि अवचटांना संपूर्ण समाजाकडूनच अभिप्रेत आहे त्याचे उत्तर "हमाल पंचायत" मधून मिळालेले आहे· त्यामुळे अवचटांची जीवनमूल्यांविषयीची धारणा अधिक बळकट होताना दिसते· पण हक्कासाठी, समतेसाठी, "हमाल पंचायतीचा" लढा कायद्याच्या स्वरूपात आला पाहिजे, तो आलेला नाही ही खंत लेखकाला आहे·

जीवनमूल्यांचा प्रचंड अभाव हा झोपडपट्टीत दिसून येतो, "वस्त्या माणसांच्या" असल्या तरी रहाणीमान पशुतुल्य, असंस्कृतपणाचे, औद्योगिकतेचे परिणाम भोगणारे, असुरक्षित आणि अस्थिरतेचे किळसवाणे जगणे म्हणजे माणसांच्या वस्त्या असलेल्या झोपडपट्ट्या होत· इथे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व याचा शोध घ्यावा लागेल· पोटासाठी शहराकडे धावणारी खेडी आणि वाढत जाणारी झोपडपट्टी यांचा विचार करावयास हवा· खेडी स्वयंपूर्ण होण्यासाठी कोणतीही योजना नाही आणि शहरांची योजनाबध्द रचना नाही· आम्ही मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय माणसांनी या समाजाकडे पहायची दारे बंद करून घेतली आहेत, ठरलेले युक्तिवाद करून, स्वतःभोवती कुंपण घालून आम्ही स्वतःवरची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करीत आहोत· असं करता येणार नाही कारण हे झोपडपट्टी-वासिय या देशाचे नागरिक आहेत, त्यांची अन्न, वस्त्र, निवारा ही गरज संपली पाहिजे, अन्यथा सर्वांना सावधानतेचा इशाना देताना अवचट म्हणतात, "आपण सर्वच एका प्रचंड आर्थिक व सामाजिक प्रक्रियेचे भाग आहोत· या प्रक्रियेत आपल्याला जरी जगण्याची सुरक्षित साधने मिळाली असली, तरी कित्येक लोक त्यात दिवसेंदिवस बेघर, बेकार होत आहेत· ते "जगण्या"साठी शहरात येत रहाणार आहेत· इथे काहीही करून

ते जगण्याचा प्रयत्न करणार आहेत· त्यांच्या जगण्याच्या झगडयातून इथली सांस्कृतिक मूल्ये ठरणार आहेत·"

स्वातंत्र्य, समता, बंधुता या सामाजिक मूल्यांचा अर्थच बदलून जाईल· हे थांबवायचे असेल तर या मानवताहीन वाईट चक्रात सापडलेल्या प्रचंड मानवसमूहाला, त्यांच्या प्रश्नांना, समस्यांना आपण समजावून घेतले पाहिजे व त्या समस्यांना अग्रक्रम देऊन सोडविले पाहिजे· झोपडया म्हणजे समाजातील "खरूज", "कॅन्सर" समजून निपटून काढण्याची भाषा उपयोगी नाही· तर समाजव्यवस्थेत, रचनेत, आर्थिक धोरणात बदल केला पाहिजे· झोपडपट्टीवासियांच्याबद्दलचा पूर्वग्रह बाजूला ठेवून त्यांच्यात समाविष्ट झाले पाहिजे, जाणे येणे सुरु करून समतेचे, बंधुत्वाचे दुवे निर्माण केले पाहिजेत तुम्हांला आता इथून कोणी हलवणार नाही, ही स्थिरतेची, स्वतंत्रतेची त्यांना हमी द्यावयास हवी·

आफ्रिकेतील एखाद्या अज्ञात देशातल्या आदिम मानवासारखे जीवन जगणाऱ्या, अघोरी देवता, अघोरी नवस यांच्यात गुंतलेल्या, समाजजीवनाच्या प्रवाहापासून खूप दूर दुर्लक्षित अशा भटक्यांच्या जीवनात तर या मानवीमूल्यांचा अभावच आहे·

स्वातंत्र्य, समाता, बंधुता, बरोबरीचे नाते, सामाजिक न्याय या कोणत्याच तत्त्वाशी त्याचा संबंध नाही· आपण मध्यमवर्गीय माणसे या भटक्या माणसाशी सहजीवनाचा प्रवास करताना या (दुर्लक्षितांचा) कधी सहानुभूतीने विचार करावा असे वाटत नाही· "भटक्या" विषयीच्या समाजशास्त्रीय स्पष्टीकरणाने त्यांचे आजचे प्रश्न सुटणार नाहीत, तर ते प्रश्न मानवतेच्या भूमिकेवर, डोळसपणे पाहिले पाहिजेत, सहानुभूतीने समजावून घेतले पाहिजेत· त्यांना आपल्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे, हे भटके म्हणजे दलितांपेक्षा दलित आहेत, त्यांची हजारो वर्षाची उपेक्षा संपवली पाहिजे, मानवीमूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी त्यांच्यात, त्यांच्यासह काम करावयास हवे·

"अंधेरनगरी निपाणी"तील स्त्री-पुरूष कामगारांच्या जीवनातील अंधार मानवी मूल्यांना गाडणारा आहे· या अंधाराला स्वार्थी, व्यापारी, कारखानदार, सत्तांध शासन जबाबदार आहे· मध्यमवर्गीयांची तर या कामगारांच्या हलाखीच्या परिस्थितीकडे पाहण्याचीही इच्छा नाही·

शीलापासून शरीरापर्यंत इथे सगळा अत्याचार आहे· स्त्री म्हणजे भोगण्याचे, वापरण्याचे साधन आहे· ही हलकट प्रवृत्ती, मग्रुरी इथल्या श्रीमंत व्यापारी, कारखानदारांच्यात आहे· मानवी जीवनमूल्ये, माणुसकी पैशापायी पायदळी तुडवली जातात·

जातीय मागासलेपणा, अंधश्रध्दा, देवदासीपण, प्रचंड आर्थिक शोषण यामध्ये या कामगाराला जगणे मुष्कील होते· त्यामुळे स्वतःच्या स्त्रीवर होणारा अन्याय इथल्या पुरूषाला डोळे उघडे ठेवून सहन करावा लागतो· मरणप्राय यातना भोगणा-या या माणसांपर्यंत ना पावित्र्य, चारित्र्य यांचा विचार पोहचतो ना स्वातंत्र्य, समता, बंधुत्व इथे पोहचतात ते प्रचंड शोषण करणारे हात, अक्षरशः मानवतेची विटंबना· मात्र इथला मध्यमवर्गीय माणूस अतिशय थंडपणे हे सारे पहातो· या अत्याचाराविरूध्द त्याचा कधी आवाज नाही, कामगारांसाठी संघटना नाही, कायदे कानून नाहीत, दहा पैशाला महाग असलेली ही माणसे "जिच्या चेह-यावर पाणी, तिच्यासाठी निपाणी"[१] अशा सूत्रात जगणा-या आणि मरणा-या माणसांचा मानवी मूल्यांवरचा विश्वास कधीच उडालेला आहे· हा कामगार अतिशय कमजोर आहे· निपाणीतील कारखानदारांच्या अमर्याद शक्तीला विरोध करण्याचे सामर्थ्य या कामगारात लेखकाला दिसत नाही·

प्रचंड मानवी समूहाचे हे अधःपतित जीवन आपण "माणसं" म्हणवून घेणारे पहातो आहोत, समाजाचे घटक म्हणून जबाबदार आहोत ही अपराधीपणाची भावना व्यक्त करताना अनिल अवचट पुन्हा एकदा या दुर्लक्षित मानवसमूहाचे जीवन मानवी मूल्यांवर अधिष्ठित झाले पाहिजे याचा ध्यास घेतात, आग्रह धरतात· स्वातंत्र्य, समता , बंधुत्व, बरोबरीचे नाते, सामाजिक न्याय व माणूसपण यासह सर्वजण सहजीवनाचा प्रवास आनंदात करू ही अवचटांची धारणा आहे·

<u>माणूसपण कोमेजून टाकणारी व्यवस्था</u> :-

अनिल अवचट माणूसपण कोमेजून टाकणा-या व्यवस्थेविरूध्द पोटतिडकीने आपली मते मांडतात, आवाज उठवतात, पण त्यात उगीच आक्रस्ताळेपणा नाही, संताप नाही, द्वेष नाही तर या समाजव्यवस्थेचे भक्ष्य ठरणा-यांचे दुःख ते विनम्रपणे मांडतात·

समाजात श्रीमंत-गरीब, मालक-मजूर, शोषक-शोषित, सवर्ण-दलित ही विषमता वाढत चाललेली आहे· परंपरागत व्यवस्था बदलली पाहिजे· नवी समतेची,

बरोबरीच्या नात्याची, सामाजिक न्यायाची यंत्रणा आणली पाहिजे· संस्कृतीची, मानवतेची चाड मनात ठेवून शोषितांच्या प्रश्नात लक्ष घातले पाहिजे· फार मोठे आव्हानाचे हे काम आपल्यासारख्या "माणूस" म्हणवून घेणाऱ्यावरच आहे·

कारण आज "माणूस" नावाच्या प्राण्याला जनावराचे जीवन माणसानेच आणून दिलेले आहे· त्याची मनाला ना लाज ना खंत· उलट या व्यवस्थेलाच खतपाणी घालणारे अधिक आहेत· ही तळागाळातली "माणसं" अशीच अडाणी, अज्ञानी, उच्च-वर्गीयांची कामे करत राहतील म्हणजे त्यांची श्रीमंती फुलत राहील ही त्यांची भूमिका आहे· शोषितांच्या जीवनाला मानवी मूल्यांचा स्पर्श व्हावा, अशी उच्चवर्गीयांची धारणाच नाही· उलट या सामान्य माणसाचे माणूसपण कोमेजून टाकणा-या व्यवस्थेचे न संपणारे वर्तुळ बनलेले आहे· ह्या वर्तुळाचा वेध अवचट मोठया समर्पकपणे "अंधेरनगरी निपाणी" मध्ये घेतात·

निपाणीतील व्यापारी जर्दावाले, विडीवाल्यांकडून जर्द्याचे खूप भाव घेतात, विडीवाले कामगाराला कमी वेतन देतात· व्यापारी शेतकऱ्याला लुबाडतो, शेतकरी त्याच्या शेतावर चौथाईने काम करणा-या कुळाला लुबाडतो, आपले भागत नाही म्हणून ते कुळ प्रचंड तासांच्या, हालअपेष्टांच्या तंबाखू करण्याच्या कामावर येते, स्त्रीला व्यापाऱ्याकडे पाठवतो· या वर्तुळात व्यापाऱ्याकडून दोघांचेही शारीरिक, मानसिक, आर्थिक शोषण केले जाते, स्त्री-कामगाराकडून शोषून घ्यायला तिच्याकडे स्त्रीत्व हे अधिक असते· तेही शोषून घेतले जाते· शोषणाऱ्यांना लाज वाटत नाही, शरम वाटत नाही उलट स्त्री वरील अत्याचार टागोरांच्या शांतिनिकेतनमध्येही चालतात, त्यात काय ? असे निर्लज्ज समर्थन करणारे व्यापारी मानवी संस्कृतीस अधिक काळिमा आणणारे आहेत·

अशी ही समाजव्यवस्था आणि त्या व्यवस्थेचे भक्ष्य होतात ती तळागाळातील माणसं, त्या माणसांचे दुःख संपूर्ण पुस्तकात, विविध स्वरूपात लेखक नम्रपणे मांडतो·

असेच वर्तुळ शहरात पुण्या-मुंबईकडे नोकरदार स्त्रियांच्या बाबतीत आहे, कित्येक वेळा त्यांना ही स्त्रीत्वाची किंमत द्यावी लागते· तर खेडयात शेतमजूर स्त्रिया शेतमालक, बागाईतदारांना बळी पडत असताना दिसतात किंबहुना दलितांवरील अत्याचारा-इतकेच हे भीषण आहे· हा मानवी जीवनातील किळसवाणेपणा म्हणजे माणूसकी कोमेजून

टाकणारा चक्रव्यूह आहे·

दुष्काळी परिस्थितीने जे उपरे झाले, झोपडपट्टीत राहिले ते पुन्हा गावाकडे गेले नाहीत कारण तिथे रोजगार देणारी शासकीय यंत्रणा नाही, आणि असेल तर त्या यंत्रणेवर विश्वास नाही· रोजगार हमी योजनेची कामे सुरु झाली तरी त्याचा फायदा पाटलांच्या पाव्हण्यांना, घरी बसून हजेरी लावून मिळणार नि यांची कष्टाला तयारी असून, पोटाची गरज असून काम नाही अशी ही सधनवर्गाची मक्तेदारी म्हणजे एक प्रकारचे सामान्यांचे शोषणच होय· इथे पुण्यात भीक मागून जीव जगवता येतो पण तिकडे आमची प्रेते पडली तरी माती द्यायला कुणी यायचे नाही या कडवट प्रतिक्रियेसह हे मानवतेचे विदारक चित्र अवचट नम्रपणे रेखाटतात·

अनवाणी पायाने उन्हात गाडी ओढणाऱ्या हमालांच्या पायातील वहाणांची काळजी हे मोटारगाडीतून जाणारे कधी करणार नाहीत· उपेक्षितांच्या डोक्यावर छप्पर नाही, खायला दोन वेळेचे मिळत नाही याची खंत हॉटेलात पार्ट्या करणाऱ्यांना नाही· नोकरशहांनी हमालांना पिण्याच्या पाण्याचा एक नळ उपलब्ध करून देऊ नये असे हे लाजीरवाणे जगणे आहे· हमाल आणि वरिष्ठ वर्ग यांच्यात काही माणूसपणाचे नातेच नाही, त्यांच्या दृष्टीने ते राबणारे जनावर आहे·

मिरचीच्या दाहाने हमालाच्या अंगाची आग होते, तर पत्नी सहवासाचे सुख न लाभल्याने, कधी या दाहामुळे ती सोडून गेल्याने त्याच्या आयुष्याची होळी होते· तर रेल्वे हमालाच्या हाताची लाकडे लेखकाच्या मनावर चरा उठवून जातात नि लेखकाचे संवेदनशील मन, जीवनातील हळव्या भागाचा शोध घेते. तो फुलाच्या पाकळीवरून, लहान मुलाच्या गालावरून, स्त्रीच्या ओठावरून हात फिरवताना येणारी हळुवारता या हमाल नावाच्या माणसाच्या लाकडी हाताला कशी अनुभवता येणार ? जीवनातील या संवेदनशील प्रेमाला मुकणाऱ्या माणसाचे माणूसपण फुलणार तरी कसे ? आणि समाजाला तरी आनंदमय जीवन लाभणार कसे ? हे प्रश्न अवचट वाचकांच्या मनात निर्माण करतात·

एका हमालाच्या मृत्यूने ना शासन, ना व्यापारी, ना वृत्तपत्रे हलतात, त्या हमालांनाच वर्गणी काढून त्याचा अंत्यविधी करावा लागतो, त्याच्या पत्नीला भाऊबीज देण्याचे भान ठेवावे लागते· सहका-याच्या दु:खात सहभागी होताना काही काळ

स्वतःच्या दारिद्र्याचे भान ते विसरतात.

स्वातंत्र्यानंतर सुध्दा आपण खेडी स्वावलंबी केली नाहीत, रोजगाराची निर्मिती नाही, शहरांची रचनाबध्द वाढ नाही परिणामतः झोपडपट्टी हा माणसांची जनावरे बनवण्याचा प्रचंड कारखाना निर्माण झाला, या व्यवस्थेचे वर्णन करताना अवचट म्हणतात, "इथे दाखल होणारा किंवा जन्मणारा माणूस हळूहळू या पशु संस्कृतीचा भाग होऊन जातो. इथे माणसे सांगकामे बैल तरी असतात किंवा हिंस्र पशू तरी असतात किंवा घाणीत रहाण्यात आनंद वाटणारी डुकरे तरी असतात."[१०] भटक्या जाती-जमातींच्या लोकांचे जगणेदेखील यापेक्षा वेगळे नाही, ते तर आर्थिक शोषण, अज्ञान, अडाणीपण, अंधश्रध्दा आणि रीतीरिवाज, जातपंचायत यात गुरफटून गेलेले दिसते. ही समाजव्यवस्था अशीच राहिली तर एक दिवस "माणूसपण" उद्ध्वस्त होईल.

अवचटांनी या पाच लेखातून माणूसपण कोमेजून टाकणा-या समाजव्यवस्थेवर प्रकाश टाकताना उच्च, श्रीमंत, व्यापारी, कारखानदार, सधन शेतकरी, मध्यमवर्गीय यांच्या विरूध्द त्वेष व्यक्त केला नाही, संताप व्यक्त केला नाही, पण ज्या समाजव्यवस्थेत आपण राहतो, आपणांला माणूस म्हणवून घेतो या व्यवस्थेत एक प्रचंड मानवसमूह भक्ष्य ठरतो आहे, हे बरोबर नाही, ही व्यवस्था आपण बदलली पाहिजे. त्या दुर्लक्षित माणसाला बरोबरीच्या नात्याने, बंधुत्वाने वागवले पाहिजे, त्याचे प्रश्न, त्यांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत, त्याला स्थिरतेची हमी देवून, आत्मविश्वास निर्माण करून त्याचे माणूसपण जपले पाहिजे, हमाल पंचायतीच्या माध्यमातून आढावांनी हे केले आहे हे त्याचे सुंदर उदाहरण आहे. निपाणीत हा प्रकाश प्रा.सुभाष जोशी आणू पहाताहेत. अवचटांचे तर म्हणणे असे की, या माणूसपण कोमेजून टाकणा-या अन्यायी व्यवस्थेविरूध्द मानवी हक्कावर चर्चा करणारे, सुशिक्षित, विद्वान, बँक असोसिएशन यांच्या संघटनांनी न्यायासाठी, परिवर्तनासाठी झगडले पाहिजे.

## वास्तववादाने चिंतनाभिमुख चित्रण :-

"माणसं" मधील लेखन हे "दुष्काळग्रस्त", "हमाल", "झोपडपट्टी", "भटके" आणि तंबाखू कामगारांच्या जीवनाचे वास्तववादी, चिंतनाभिमुख चित्रण करणारे आहे. या चित्रणात लेखकाचे अचूक निरीक्षण, जीवनमूल्यांचा शोध आणि मानवी जीवनातील

विसंगती यांचे वास्तववादी दर्शन घडते· या लेखनात खोटी माणुसकी, पोकळ सहानुभूती, जीवनमूल्यांच्यासाठी आटापिटा, विशिष्ट वर्गाबद्दल संताप, त्वेष असे काही नाही· मूलभूत प्रश्नांना हात घालून, अंतर्मुख होऊन त्या प्रश्नांचा शोध लेखकाच्या मनात चालत असताना दिसतो· त्यामुळे हे लेखन मनापासून, अंतःकरणापासून आलेले आहे· यामध्ये कोणतेही कल्पनेने रंगविलेले चित्र नाही किंवा खोटया आशावादावर आधारलेला विचार या चित्रणात नाही पण त्याबरोबर ही विचारांची थप्पी नाही किंवा चविष्टपणे लिहिणेही नाही·

दुष्काळग्रस्तांच्या या जगात कसाबसा जगण्याचा वेळ काढण्यासाठी राबण्याचे साधन असणारा विळा, डोकीचा फेटा, रूपाया दोन रूपायाला विकावा लागतो , कागद, भंगार शोधण्याचा रात्रंदिवसाच्या वणवणीतून या माणसाला साठ पैसे मिळतात, त्यात कुटुंब त्याने जगवायचे·

कचरा डेपोत भंगार मिळवण्यासाठी जमीन उकरून काढलेला खड्डा पाहून अवचट म्हणतात, "ऐतिहासिक वस्तूच्या शोधासाठी केलेल्या उत्खननाची आठवण झाली, तोही शोधच आणि हाही शोधच ।"[११] या वाक्यात अवचटांच्या चिंतनातून वास्तवाचे भेदक चित्रण आले आहे· नंतरच्या शोधाने संवेदनशील माणसाची मान खाली झुकते·

इथे परिपूर्तीमधील उत्तर गुजरात येथील उत्खननातील स्त्री सांगाडयाला पाहून "तू ती मीच का ग ? तू ती मीच का ग ?[१२] असे विचारत एका सनातन प्रश्नाचे चिंतन मांडणाऱ्या इरावतीबाई कर्वे यांची आठवण येते· प्राचीन संस्कृती व अर्वाचीन संस्कृती येथे समोरासमोर येतात· उत्खननातील स्त्री सांगाडयावर काळाची किती तरी पुटे चढली तर या वर्तमानातील शोधावरही अश्रू, कष्ट यांची पुटे चढलेली आहेत· ललित लेखनातील चिंतनपरतेची वाट अवचटांनी अधिक रेखीव केलेली आहे, असे म्हणावेसे वाटते·

दुष्काळग्रस्तांनी "भीक मागून पोट भरायला जावे तर लोक दार लावून जेवण करतात, मागायला गेले तर "आता काळं करा तुम्ही तुमच्या मुलखात· इथं आम्हांला राकेल मिळंना आन दाणं मिळंना, तुम्हाला कुठलं घालायचं ?"[१३] आजच्या मध्यमवर्गीयांचे जगणेही अवघड बनते आहे· त्यामुळे माणुसकी, शेजारधर्म ही सारी मानवीमूल्ये विसरून तो वैताग व्यक्त करतो तर श्रीमंत या सामान्य माणसांच्यावर कुत्रा सोडतो किंवा चोरीचा

आरोप करून पळवून लावतो तर कुपोषण, औषधाअभावी एका वस्तीत दीड वर्षात पस्तीस मुलांचे मृत्यू झाले नि त्यांना कुठेही पुरले, ना सर्टीफिकेट, ना सरपण, ना जन्माची नोंद ना मरणाची अशी ही अस्तित्वहीन माणसांची वस्ती अवचटांच्या चिंतनाचा विषय बनते·

समाजातील श्रीमंत, व्यापारी, उच्च, मध्यमवर्गीयांच्या दृष्टीने हमाल म्हणजे बेवारशी जनावरे, ना निवारा, ना पिण्याचे पाणी, हमाली करताना मेलेल्या हमालासाठी कोणाचे दोन शब्द नाहीत, भरपाईचा विचार नाही· वर्गणीतून त्याचे क्रियाकर्म करावे· हमालीतील वर्षभर काही पैसे बाजूला ठेवून दिवाळीला भाऊबीज म्हणून चोळीलुगडे त्या हमालाच्या विधवा पत्नीला देणारा हमाल हे विचार करावयाला लावणारे वास्तव चित्र आहे, अवचट म्हणतात, "कधी न पाणावणारे डोळे पाणवायला लागले, स्वतःविषयी घृणाच वाटायला लागली· आपण कुठल्या वर्गात रहात आहोत, किती बोथट झालो आहोत, किती कृतघ्न आहोत, आपला चांगुलपणाही किती वांझोटा आहे···"[१४]

अवचटांचे हे चिंतनपर विचार, प्रश्न निर्माण करतात· यात "कोण माणसं···· कोण जनावरं···" हा प्रश्न अंतःकरणाला घरे पाडतो·

हमाल पंचायत निर्माण झाल्यानंतरही हा झगडा द्यावा लागला. कारण समाजातल्या सुजाण वर्गाने या सुधारणा आयत्या किंवा सुखासुखी मिळू दिलेल्या नाहीत· बाबा आढावांनी एकत्र आणलेला हा हमाल मात्र झोपडपट्टीवासियांसाठी मोर्चे काढतो, धरणग्रस्तांसाठी धरणे धरतो, सत्याग्रहीसाठी जेवण पुरवतो, बाबांच्या "एक गांव एक पाणवठा" मोहिमेचा खर्च चालवताना दिसतो·

या बदलाचे, परिवर्तनाचे चित्रण अवचट करतात त्यावरून स्पष्ट होते की माणसाला "माणूस" म्हणून जगण्याची संधी दिली, बरोबरीच्या नात्याने वागवले की, तो फुलतो, आनंदी होतो· हमाल पंचायत स्थापण्यापूर्वी हमालाचे जीवन म्हणजे निर्मितिशून्य जनावराचे जिणे इथे बैलाला आणि माणसांना श्रमाचा वाटा सारखाच दिला जातो. त्यालाही जनावरपणाची टोचणी खच्ची करून टाकायची, व्यसनी बनवायची. हमाल पंचायतीने त्यांच्या जीवनात माणूसपण आणले, व्यसने कमी करण्याचा प्रयत्न होतो आहे· कामातील निर्मितीचा आनंद श्रमसाफल्य देऊन जातो आहे, याचे प्रत्यंतर या लेखाच्या शेवटी येते·

"झोपडपट्टी म्हणजे असुरक्षितता"[१५] या तीन शब्दांत आजच्या युगाचे वास्तव दर्शन लेखकाने घडविले· हे तीन शब्दांचे वाक्य अवचटांच्या मानवी समूहाविषयीच्या चिंतनाचा पुरावा आहे, येणाऱ्या जीवन संस्कृतीविषयीचा सावधानतेचा इशारा आहे· झोपडपट्टी झपाटयाने वाढते आहे· अशा वेळी उच्च व मध्यमवर्गीय लोकांनी या समाजाकडे पहायची दारे बंद करून घेऊन चालणार नाही, ती त्यांना उघडावी लागतील· स्वतःभोवती कुंपण घालून वाढणाऱ्या झोपडपट्टीची जबाबदारी झटकता येणार नाही· कारण आपण सगळे एकाच आर्थिक आणि सामाजिक प्रक्रियेचे भाग आहोत· उद्या या झोपडपट्टीवासियांच्या जगण्यातून इथली सांस्कृतिक मूल्ये ठरणार आहेत· या समस्येला सहानुभूतिपूर्वक अग्रक्रम देऊन नाही हाताळले तर ही असुरक्षितता मध्यमवर्गाला नव्हे साऱ्या समाजाला केव्हाच गाठेल हे वास्तवाचे भान लेखकाने दिले आहे·

"वैदू, कैकाडी, वडार यांसारख्या जमाती नाना धंदे करून आपले पोट भरतात किंवा निरनिराळ्या प्रकारे भिक्षा मागून जोशी, चित्रकथी, वासुदेव, गोंधळी, डवरी, बैरागी इत्यादी जमाती आपली उपजीविका करतात· कोल्हाटी, डोंबारी, माकडवाले, मदारी ह्या जमाती करमणुकींचे खेळ करून तर फासेपारधी, मारवाडी, कुंभार, कंजारभाट या जमाती चोऱ्यामाऱ्या करून आपले पोट भरतात· आपल्यात वावरत असून, वर्षानुवर्षे या संस्कृतीची घसट असूनही, हे लोक आदिमानवाच्या संस्कृतीत आजतागायत कसे राहिले असावेत"[१६] असा मूलभूत प्रश्न उभा करून लेखक या भटक्या जमातीच्या जीवनाचा वेध घेताना दिसतो· भटक्यांचे हे जग समाजपरिघाबाहेर ठेवलेले आहे· हजारो वर्षे त्यांची उपेक्षा केली आहे· त्यांच्यापर्यंत ना निवडणुका, ना शिक्षण, न्याय, आरोग्य, गृहनिर्माण, योजना, बँक पोहचल्याच नाहीत· स्लॅब गळताना अस्वस्थ होणारे आम्ही भटक्यांची "पाले" चिखलात मिसळली, उडून गेली तरी त्याची दखलही घेत नाही· गॅस न मिळणे, कॅडबरी न मिळाल्याने मुलगी शाळेला जात नाही· पाश्चिमात्य स्मग्लिंगचे लिपस्टीक न मिळालयाने देशी लिपस्टीकने ओठ आत ओढले जातात, काळे पडतात· ह्या आमच्या ऐतखाऊ सुस्त समाजातल्या वेदना तर पलिकडे भटक्यांच्या जगात पोलिसांनी पारधी स्त्रीच्या ढुंगणात भर रस्त्यावर दांडू घातला, तरी आम्हांला ती वेदना भिडत नाही, इतकं निगरगट्ट नि निर्लज्ज जीवन आपण जगतो, याला माणूस म्हणून जगणे म्हणायचे का, असा प्रश्न अवचट उभा करतात·

निपाणीतील तंबाखू कामगारांचे हलाखीच्या जीवनाचे वास्तववादी चित्र, प्रचंड भयानक आहे· निपाणी म्हणजे अंधेरनगरीच आहे· जणू काही फार पूर्वीच्या गुलामांच्या कथेत असावी तशी· अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजांसाठी सुध्दा हा कामगार झगडू शकत नाही, संघटित तर होऊच शकत नाही आणि संघटित होण्याच्या शारीरिक अवस्थेतही नाही· रात्रंदिवस तंबाखूच्या विडया वळण्याचे एकसुरी काम, रॉकेलच्या दिव्याचा काळा धूर खाऊन, दिवसभर कच्ची विडी ओढून, त्यांच्या छात्या कार्बनने भरून गेलेल्या, त्यावर क्षयाच्या जंतूंचे आक्रमण सुलभतेने होते· औषधपाण्याला पैसा नाही की कामाला रजा नाही· या माणसांना टी·बी· कधी संपवतो हेच समजत नाही· समजते ते फक्त यांनी आपल्या मुलांसाठी ठेवलेली टी·बी· या रोगाची देणगी· तंबाखू स्त्री-पुरुष कामगार, मजूर, तंबाखू पिकविणारा शेतकरी हे व्यापारी कारखानदार यांच्या दुष्ट चक्रात भरडले जाताना दिसतात· हे व्यापारी, कारखानदार म्हणजे या कामगारांना शोषणारा "ऑक्टोपस" आहे· इथे श्रमाला, चारित्र्याला, पावित्र्याला, शीलाला किंमत नाही· स्त्री शरीराचा माणसाला लाजवणारा बाजार मांडला आहे· निपाणीमधील मानवतेला काळिमा फासणारे हे ओरबडणे, अत्यंत नागडया हिंस्र स्वरूपात दिसते· दलितांवरील अत्याचाराइतकेच हे भीषण मानले पाहिजे; ही लेखकाची भूमिका आहे· त्यामुळे ते म्हणतात, "ज्यांना समाजात दोन वेळा पोटभर जेवता येते, त्यांना अधिक मिळण्यासाठी समाजाकडे तक्रार करण्याचा अधिकार नाही· कारण या पोटभर जेवणाऱ्यांनी आता कचरा कुंडीतून फेकून दिलेले नासके अन्न खाऊन पोट कसेबसे भरणारांसाठी काही करणे हे संस्कृतीला धरून होणार आहे· समाजातल्या सुस्थित वर्गाने हे न केल्यास माणसाची पातळी कुठल्या अवस्थेला पोहचेल याची कल्पनाही करता येणार नाही·"[१७]

नोकरदारांच्या संघटना, मानवी हक्कांसाठी झगडणारे आणि संस्कृतीची चाड असणाऱ्या सुजाण नागरिकांनी या माणसांच्या जीवनात डोकावले पाहिजे· प्रश्न, समस्या समजावून घेतली पाहिजे हे लेखकाचे आवाहन आहे, कारण मानवीमूल्यांच्या या झगडयातून प्रकाशाचा जन्म होईल· नाहीतर दिवसेंदिवस आटत जाणारा जीवनरस आणि बिघडत जाणारी परिस्थिती ही माणसांच्या जीवनाची कथासूत्र बनेल असे विचार करावयाला लावणारे "विशिष्ट समाजव्यवस्थेचे बळी ठरलेल्या समूहांच्या यातना अवचट या पुस्तकातून समोर आणतात·"[१८] असे प्रतिपादन अंजली सोमण करतात·

## अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाजांचे दर्शन :-

समाजजीवनापासून, जीवनमूल्यांपासून फार दूरवर असलेला हा मानवीसमूह अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज यामध्ये प्रचंड प्रमाणात रुतला आहे.

"अनिकेत" या लेखातील भटक्यांचे जगणे, त्यांच्या देवदेवता, त्यांचे अघोरी नवस हे सर्वसाधारण माणसांपेक्षा अगदीच वेगळे. अनिल अवचट म्हणतात, "आफ्रिकेतल्या एखाद्या अज्ञात देशातले लोक तर आपण पहात नाही ना असे वाटते. त्यांच्या जीवनाची एक एक त-हा समोर उभी समोर उभी रहाते तेव्हा जाणवते की, दहा पंधरा हजार वर्षापूर्वीच्या, आदिमानवाच्या काळात ही माणसे आजमितीला वावरत आहेत.[११]"

जाखाई , मरीआई, बोल्हाई, सटवाई या मातृदेवता व खंडोबा, बापूजीबोवा, म्हसोबा, वेताळ या पितृदेवता यांच्या उपासनेत, नवसात सारा समाज गुंतलेला दिसतो. अंधश्रध्दा, रूढी, रीतीरिवाज आणि साथीला अज्ञान यांचे अघोरी प्राबल्य दिसून येते.

वैदूंच्यात मुलीच्या केसात, कपाळावर भोवरा असेल तर अशुभ समजून जन्मताच तिला एकतर मारुन टाकतात किंवा एखाद्या डोंबा-याला देऊन टाकतात, बापाने तिला जवळ ठेवली तर नव-याला खाईल या भीतीने तिचे लग्नही होत नाही.

स्वतः वैदू असून मूल आजारी पडले की हे वैदू देवऋष्याला बोलावतात, मग बक-याचा नवस, देवाची जत्रा. यामध्ये हा वैदू कर्जबाजारी होतो.

"गोसावी" या भटक्या जमातीत माणूस मेल्यानंतर बाराव्याला बोकड कापतात, तर मुलासाठी नवस केला आणि मुले झाली तर थोरल्या मुलाला परळी वैजनाथला, तेथील नाथाच्या गादीसाठी सोडतात.

या गोसाव्याच्या कानातील सोन्याचे कडे जमिनीवर पडले तर त्याला जिवंतपणी गाडून टाकतात.

"मसणजोशी" जमात म्हणजे प्रचंड अज्ञानाचे प्रदर्शनच आहे. महिना-महिना अंघोळ न करणारा हा प्राणी प्रेत अडवून पैसे उकळतो, प्रेताच्या राखेतून सोन्याचा दात मिळतो का ते पहातो. हा भानामती करून पोट भरतो. गुप्तधनाची ओढ असणा-यांना, पुत्रप्राप्ती हवी असणा-यांना नादी लावतो, ओल्या बाळंतणीचा पदर,

पहिल्या पाच दिवसात मेलेल्या मुलाची कवटी आणायला सांगून हे जोशी अज्ञानापोटी अघोरी प्रयोग करत असताना दिसतात.

कोल्हाटयांच्यामध्येही बकरी कापण्याचा नवस आहे, गर्भार बकरी, तिचे पिलू काढून ते देवीसमोर कापतात, त्या रक्तात राणीछाप रुपाया बुडवून सगळ्यांच्या कपाळी गंध लावतात.

दुसरा एक असाच विधी या कोल्हाटयांच्यात आहे. गर्भार जनावर मारुन, त्याचा गर्भ घराशेजारी छोटया खड्डयात टाकायचा, हाडे, खरकटे पाणीही त्या खड्डयात गुपचूप पुरुन टाकायचे या विधीला "देवीचा सागर भरणे" म्हणतात.

पारधी जमातीमध्ये वर्षातून एकदा देवीला अमानुष पध्दतीने रेडयाचा बळी देतात. रेडयाला देवापुढे उभे करुन त्याच्या मानेला सुरीने भोक पाडून, धमनीतून रक्त काढून देवीवर शिंपडतात, धमनीतील कच्चे रक्त ते पितात आणि ते त्यांच्या दृष्टीने मोठे माहात्म्य आहे. काही भटक्यांत देवाच्या प्रत्येक पायरीला नारळ फोडण्याचे नवस दिसतात तर काहीत आपल्या गुडघ्याची वाटी स्वतःच्या हाताने कापून काढून, तिच्यात तेलवात घालून देवासमोर दिवा लावल्याचे दिसते. सगळेच अतर्क्य आणि अंधश्रध्दाळूपण आहे.

भंगी समाजात "पीर" देव असतो, मुलाचे नाव हिंदू तर बापाचे नाव मुसलमान पध्दतीचे आढळते. कारण भंगी समाजात मुसलमान सुईण बाळंतपणासाठी येते व त्या मुलाचे नाव त्या सुईणीने ठेवायचे असा त्यांचा रिवाज आहे. त्यामुळेच भंगी समाजात मिश्र नावे आढळतात.

वैदू जत्रेत बकरी मारुन रक्ताचा चिखल करतात, त्यावर विस्तव टाकून चालत जातात अशी पध्दत आहे.

वैदूंच्यामध्ये मुलींना हुंडा देण्याची पध्दत आहे. ती मुलगी सौद्याने विकत घेतली जाते. या विचित्र रिवाजामुळे एखाद्या म्हाता-या माणसाने दहाबारा वर्षाच्या लहान मुलीला योग्य रक्कम देऊन विकत घेतल्यास त्या लग्नास मुलीच्या बापाची आडकाठी नसते. कारण त्या बापाचे म्हणणे असे की, "गाढवाला गि-हाईक आले की ते म्हातारे की तरणे आहे ते आपण बघतो का ? जो भाव येईल त्याच्याशी आपण व्यवहार करतो."[२०]

काही वैदू गर्भारशाबाईबरोबर हजार रूपये देऊन एक व्यवहार करतात; तिला मुलगी झाल्यास तिने याला द्यायची, मुलगा झाल्यास पैसे पाण्यात; या रूढीला, व्यवहाराला "पोटातली भाजी विकत घेणे" म्हणतात.

"कैकाडी" समाजात विधवा असलेल्या सख्ख्या भावजयीशी लग्न करतात. दुसरी प्रथा म्हणजे, मुलीच्या बापाला रुपाया व आठ आणे मामाला दिले की ती मुलगी अडकते. तो दीड रूपाया काढून घेतल्याशिवाय ती मुलगी दुसरीकडे लग्न करू शकत नाही. मुलगा मात्र दुस-या मुलीशी लग्न करू शकतो. दीड रुपायासाठी लोक दुस-याच्या मुली कुजवतात.

लमाण किंवा बंजारा यांचे रिवाज खूप कडक आहेत. मुख्य गावात रहावयाचे नाही, गावात रात्र काढावयाची नाही, अंगावर कपडे घालायचे नाहीत, नवे आणून ते फाडून परत जोडून घालायचे, स्त्रियांनी ठरलेला पारंपरिक पोशाख घालायचा, गादीवर झोपावयाचे नाही, दिवा पहावयाचा नाही, हे सारे रीतीरिवाज त्यांना पाळावे लागतात. कारण ते स्वतःला राणाप्रतापचे वंशज समजतात, भारताच्या पंतप्रधानांनी चित्तोड स्वतंत्र झाल्याचे सांगितले तरी या परंपरागत रिवाजात बदल होत नाही.

जोशी जमातीच्या लग्नात बाराथळाच्या वाणाची पध्दत आहे. या जेवणात जिलेबी, लाडू, पेढे, बर्फी, खारीक, खोबरे-बदाम, काजू, पिस्ता, चारोळे, गोडेतीळ, गोडंबी इतके पदार्थ लागतात. ह्या जेवणाचा मान फक्त विवाहितांनाच मिळतो, बहिष्कृतांना नाही.

नंदीवाल्यांमधील तिरूमल्ली पोटजात संख्येने खूप थोडे, जातीबाहेर लग्न केले तर जातीतून काढून टाकतात. त्यामुळे तरूण मुलगा आपल्या कडेवर तान्हया नवरीला घेऊन लग्न लावतो तर पस्तीस वर्षाची स्त्री बारा-तेरा वर्षाच्या मुलाशी लग्न लावताना दिसते.

गोसाव्यांच्या मध्ये ठराविक दिवशी पाच घरे भिक्षा मागावी लागते. कंजारभाट जमातीच्या रिवाजाप्रमाणे पुरूषाचा खून केला तर सोळाशे रूपये दंड, पोलीस कायदा या नागर गोष्टींचा त्यांच्याशी संबंध नाही.

अशा अनेक अंधश्रध्दा, रीतीरिवाजामध्ये गुरफटलेला हा समाज. सर्दीपासून कॅन्सरपर्यंतचे सगळे उतारे देवऋष्याकडे असतात, या समजुतीने डॉक्टरकडे न जाता

पैसे व्याजी घेऊन उतारे, मंत्रतंत्र करतील. अशी ही अडाणी, अज्ञानी माणसे, अशा चमत्कारिक अंधश्रध्दांनी या समाजपरिघाबाहेरील माणसांचे जीवन व्यापलेले आहे, तर व्यापारी एखाद्या थप्पीतल्या मालाला उठाव नसला की तो जागेचा गुण समजून ती थप्पी हमालांना (जादा मजूरी न देता) दुसरीकडे हलवायला सांगतो, फायद्यासाठीच्या अंधश्रध्देतील बळीही बेरका व्यापारी सामान्य माणसांचाच देताना दिसतो.

प्रतिमांचा वापरही आशयघनतेसाठी अवचट करतात; प्रचंड पावसात उघडयावरील हे कुटुंब, फाटक्या प्लॅस्टिकचा, गोधडीचा आसरा घेते, त्या गोधडीला मध्ये थोरले मोठे भोक आहे. त्यामधून न्हाताऱ्याचा सुरकुतलेला चेहरा पाहून अवचट म्हणतात, "मला प्रायोजिक उच्चभ्रू चित्रपटातल्या अशा एखाद्या शॉटची आठवण झाली."[२१] या प्रतिमेतून प्रचंड दारिद्र, अगतिकता आणि त्याबरोबर याची अंतःकरणातून जाणीव नसलेला पण कलात्मक आनंद उपभोगणा-या उच्चभ्रूतेचे वास्तव दर्शन लेखक घडवतो. फुटक्या शिट्टीतून वारा फुंकणारा छोटा मुलगा ज्याला कल्पना नाही त्याच्या जीवनात कोणताच आवाज नाही की वारा (प्राण) नाही, कारण त्याच्या जीवनाचीच शिट्टी फुटकी आहे, ती त्याला बापाकडूनच मिळालेली आहे, जसे दारिद्र मिळाले आहे. अशा जीवन व्यवस्थतेतच त्यालाही रहायचे आहे हे या प्रतिमेतून स्पष्ट होते.

बारदानातला हमाल संभाजीबापू आरणे लेखकाला माहिती देताना कानावर पेन्सिल ठेवल्याप्रमाणे दाभण ठेवून तो बोलू लागतो, या प्रतिमेतून बोलतानाची त्याची कृती व्यवसायाशी संबंधित आहे. त्याबरोबर दाभणाऐवजी पेन्सिल हाती आली असती तर एक वेगळेच जीवन दृष्टीस पडले असते हेही स्पष्ट होते.

हमाल पंचायतीत आलेले "फॅसिट यंत्र" ही प्रतिमा बनून येते. यंत्राबरोबर लेखकाला जनावरासारखे जीवन जगणा-या माणसात संस्कृतीची चिन्हे, माणूसपणाची धाकधूक दिसू लागते.

तंबाखू स्त्री-पुरूष कामगारांचे चहूबाजूंनी, शारीरिक, मानसिक, आर्थिक असे शोषण करणा-या तंबाखू व्यापा-यांचे अमानवी वागणे हे भयंकर आहे, हे या प्रतिमेतून लेखकाने दर्शविले आहे.

जीवनाविषयी अज्ञान, अंधश्रध्दा या दुर्लक्षित तळागाळातील समाजातून दूर केल्या पाहिजेत. त्यांच्यामध्ये जीवनमूल्ये, सांस्कृतिक मूल्ये जोपासली पाहिजेत. समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना सामील करून घेतले पाहिजे. त्यांना ज्ञान, विज्ञानांचा स्पर्श होईल, रोजगार मिळेल, स्थैर्य प्राप्त होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. म्हणजे येणाऱ्या पिढीची तरी या दुष्ट चक्रातून सुटका होईल असा आशावाद लेखक "माणसं" मध्ये प्रगट करतो.

**सारांश**

या पाचही लेखातील शोषित अज्ञान, दारिद्र्य, गुलामी, असहाय्यता यांना बळी पडलेले आहेत. रीतीरिवाज, उच्च वर्गीय संस्कृती यांच्या विरूध्द लढण्याचे भान जसे त्यांना यावयास हवे, तसेच इतर समाजालाही, याचे संसूचन अवचट करतात.

या नंतर "माणसं"तील अभिव्यक्तीचे विशेष पाहण्याचे योजिले आहे.

## अभिव्यक्तीचे विशेष :-

आतापर्यंत आपण "माणसं"मधील आशयाचे विशेष पाहिले. यापुढे आपण "माणसं"चे अभिव्यक्तीच्या दृष्टीने विशेष पहाणार आहोत.

अनिल अवचटांचे लेखन त्यांच्या स्वतःच्या खास अशा शैलीतून, उपऱ्या, उपेक्षित, दुर्लक्षित भटक्या शोषित जाती-जमाती व मानवसमूह यांचे समाजपरिघा-पलिकडील जीवनाचे दर्शन मराठी माणसांना प्रथमच घडविणारे आहे. एका संवेदनक्षम मनाने केलेले हे समाजमानसाचे निरीक्षण आहे. त्यामुळे अवचटांचे हे "रिपोर्ताज्" पध्दतीचे लेखन "ललित गद्याला" एक वेगळे परिमाण देणारे आहे.

### दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन :-

समाजाच्या तळाशी राहून, जीवनभर सतत कष्ट उपसत उपेक्षित आणि कंगाल जीवन जगणाऱ्या, "दबलेलया माणसांचे" प्रत्ययकारी दर्शन या पुस्तकातून अनिल अवचट अभिव्यक्त करतात.

प्रचलित विषम आणि शोषणकारी समाजरचनेसंबंधीची ही समूहचित्रे मानवी मनात अपराधित्व, अस्वस्थता निर्माण करण्यात यशस्वी होतात. इथेच त्यांच्या लेखन

सामर्थ्याची अभिव्यक्ती स्पष्ट होते. उदा.

"रस्त्यावरून मुंडासे घातलेला एक म्हातारा एक हातगाडी ओढीत चालला होता. ग्यानबांनी त्याला "पहिलवान" म्हणून हाक मारली. कृश शरीराच्या थकलेल्या म्हाता-याला पहिलवान म्हटले म्हणून जरा आश्चर्य वाटले. ग्यानबा म्हणाले, "हे थेऊरकर. यांचे तरुणपणी "असलं" शरीर होतं । खूप कुस्त्या मारायचे. पुढे गुळात काम करून यांचे असं "चिपाड" झालंय. पहिलवान जरा कपडे काढून दाखवा पाव्हण्यांना."[२१]

हातगाडी ओढणा-या या म्हाता-या हमालाला "पहिलवान" म्हणून हाक मारताच आश्चर्याचा झटका बसतो. कारण त्याच्या दर्शनात पहिलवानाचे कोणतेच लक्षण त्याच्या शरीरावर दिसत नाही. ग्यानबांनी त्या म्हाता-या थेऊरकरला कपडे काढायला लावून पूर्वी कुस्ती मारणा-या शरीराचे गुळात काम करून कसे चिपाड झाले आहे, त्याने प्रात्यक्षिक घडवले. या पहिलवानाचे तरुणपणी "असलं" शरीर होत आणि पुढे गुळात काम करून "असं" म्हणजे चिपाड झालंय, या दोन "असं" मध्ये जणू ते पिरगळून काढले आहे, हे स्पष्ट होते. ऊस एकच पण एकाचा गूळ बनतो, एकाचे चिपाड होते. समाजाच्या विषम चरकातही राबणा-या माणसाच्या जीवन रसावर श्रीमंत अधिक फुलतो नि राबणा-या माणसांचे चिपाड कसे होते हे आपणास सहज पटते. पहिलवान चिपाड बनणा-यांचा प्रतिनिधी आहे. थोडयाफार फरकाने सा-या हमालांचे असेच होणार आहे. हे अवचटांचे भाष्य व वाचकांच्या मनातील विचार एक होतात व भविष्य नसलेल्या निराश पहिलवानाचे काय होणार ? कोण जाणे ? या अर्थाने उडवलेला हात व बिचा-याच्या दबलेल्या आवाजाचे प्रत्ययकारी तरंग वाचकाच्या मनात उमटतात.

"समोरच्या जमावात काही तरुण मुलांनी डोक्याला, डाकू बांधतात तशा, आडव्या कापडी पट्टया बांधल्या होत्या. त्या सहज फॅशन म्हणून बांधल्यात का ? असे विचारता यल्लापा म्हणाला, "या मुलांना देवाला सोडलं आहे, याला मरीआईला, त्याला सटवाईला, याला म्हसोबाला, कोणाच्या रविवारी, कोणाच्या मंगळवारी, तर कोणाच्या गुरुवारी अंगात येतं. कुणाची बाधा असली तर हे बरोबर काढून टाकतात. यांना देवाचं येतं म्हणून कडक नियमही पाळावे लागतात. केस कापता येत नाहीत. वाढलेले केस डोळ्यावर येऊ नये म्हणून त्या पट्टया बांधल्या आहेत."[२२]

या समूह-चित्रणातून देखील या दबलेल्या माणसाचे प्रत्ययकारी दर्शन घडते· खूप वेळा या माणसांनी हे दबलेपण, स्वतःचे अज्ञान, रीतीरिवाज, परंपरा, अंधश्रध्दा यातूनही स्वीकारलेले आहे हे स्पष्ट होते· जमावातील वर्ग तरूणांचा आहे पण तोही परिवर्तनात पुढे जात नाही किंवा तो विचार त्यांच्यापर्यंत पोहचलेला नाही, त्याच्या डोक्याची पट्टी पाहून डाकूची आठवण होते, पण ते डाकू नाहीत, फॅशन असावी असे वाटते पण फॅशन नाही हे जेव्हा "त्यांना देवाला सोडले आहे" हे समजते; तेव्हा ते परंपरेचे अंधश्रध्देचे बळी आहेत हे लेखक वाचकांच्या मनावर ठसवतो· वेगवेगळ्या देवता त्या अंगात येणे मग अघोरी उपाय, कडक नियम, यांचे स्पष्टीकरण जेव्हा संवादाद्वारे मिळते तेव्हा परंपरेत अडकलेल्या या तरूणांच्या समूहाचे चित्र जिवंत होते· आजच्या पट्टी बांधण्याच्या फॅशनची आठवण व कालच्या रीतीरिवाजाचे क्लेशकारी वास्तव येथे एकत्र येते. व याचे चित्रण प्रत्ययकारी बनते·

"या गावातून रोज पहाटे असे धावत चालणारे स्त्रियांचे तांडे निपाणीच्या दिशेने येत असतात· प्रत्येकीच्या डोक्यावर घमेले· त्यात दुपारची भाकरी ठेवलेली असते· हातात एक भाकरी घेऊन तुकडे मोडीत, खात-खात त्या धावत असतात· एक स्त्री म्हणाली, "कुत्रसुध्दा थांबून भाकरी खातं, पण आम्हांला वेळ नाही, बघा कशी आमच्यावर पाळी आली आहे·"[२१]

उगवणा-या सूर्याबरोबर पोटासाठी धावणा-या तंबाखू कामगार स्त्रियांचे आयुष्य सुरू होते, जीवनाचा प्रवास सुरू होतो तो अंधेरनगरीकडे त्या माणुसकीहीन अंधारात चारित्र्य, पावित्र्य, शील, स्वाभिमान, सारे पोटासाठी गहाण टाकून हा तांडा एकाच दिशेने चालला आहे, त्या दिशेने जाऊनही पोटभर अन्न मिळत नाही, क्षणभर बसून अपुरे का असेना दोन घास खावेत तर निवांतपणा मिळत नाही· हातात भाकरी घेऊन तुकडे मोडीत, अशीच आयुष्याची ही वाट दारिद्र्याची शिदोरी घेऊन धावत असणा-या या स्त्रियांना माहित आहे, आपले हे असे धाव-धाव करणारे जिणे कुत्र्याच्या जिण्यापलिकडचे आहे, या समाजरचनेत कुत्र्याला किंमत आहे, तो थांबून भाकरी खातो पण इथे राबण्याऱ्या माणसाला किंमत नाही, हे या अडाणी स्त्रियांनाही माहीत आहे· त्यामुळे या अशा पशुपातळीपलिकडचे जीवन जगण्याची पाळी आपणावर आली आहे· याकडे थोडे बघा असे विनम्रपणे त्या बायकोला सांगताहेत· या दबलेल्या स्त्रियांच्या

अगतिक जिण्याच्या प्रत्ययकारी दर्शनाने वाचक अस्वस्थ होतो.

"पुण्यातल्या वडारवाडीत तर भरपूर भट्ट्या आहेत. गि-हाईक बसायला शेडस् आहेत. झोपडपट्टीत एरवी नळाची बोंब असते. इथे प्रत्येक भट्टीला वेगळे नळ कनेक्शन आहे. मागच्या बाजूला सिमेंटची गटारे आहेत. त्या शेजारी पिंपे ठेवायला रुंद जागा आहे. भट्टीसाठी जाळायला लाकूड लागते. म्हणून वस्तीत लाकडाच्या वखारी झाल्या आहेत. लाकडे वहायला हातगाडीवाले आहेत. दारूला खराब काळा गूळ व नवसागर लागतो. ते पुरविणारी मारवाड्याची दुकाने झाली आहेत. वस्तीतल्या चारपाच हिजड्यांनी प्रत्येकी चारसहा मुली ठेवल्या आहेत. त्या गि-हाईकांना नादी लावून वेश्या व्यवसायही करतात. थोडक्यात हा धंदा म्हणजे एक "उद्योगसमूह"च झाला आहे."[२५]

"माणसं" विज्ञानयुगात जगत असताना वरील "उद्योग समूहाची" रचना, विकास पाहिला तर मानवी जीवनाचे किती अधःपतन होते आहे हे स्पष्ट होते. व्यसनात गुंतलेल्या माणसांच्या एकविसाव्या शतकातील भविष्याचे चित्र अधिक भेसूर दिसू लागते. इथे माणसांना रहायला निवारा नाही पण भट्टीजवळ बसायला शेड आहेत, झोपडपट्टीत पिण्याच्या पाण्याचा नळ नाही पण प्रत्येक भट्टीला वेगळे नळ कनेक्शन आहे, मनोरंजनाला वेश्या आहेत, जे जे मानवी जीवनासाठी वाईट आहे त्याचे त्याचे इथे अधिराज्य आहे. व्यसनामुळे जीवनाच्या भट्ट्या बिघडल्या आहेत. सामान्य माणसाला, त्याच्या भविष्यास खोलगर्तेत लोटणारा हा उद्योगसमूह, त्यासाठीची समर्थने ही राजकीय पॉलीसी झाली आहे. ही दूरावस्था अवचटांनी प्रत्ययकारी स्वरूपात रेखाटली आहे.

"पुण्यात झोपडपट्ट्यांमध्ये एखाद्या कोप-यात सिमेंटचे चार फूट उंचीचे बिनबुडाचे पाईप त्यात कचरा टाकायला कचरा पेटया म्हणून उभे केलेले असतात. एका वस्तीतला असा एक पाईप आडवा पडलेला होता. आसपास घाणेरडया कच-याचा ढीग विखरून पडला होता. पाच-सहा लहान मुले त्यात मनसोक्त शिवाशिवी खेळत होती. पाईपच्या एका बाजूने जाऊन दुस-या बाजूने बाहेर पडत होती. एखाद्या हिरवळीत बागडावे तशी बागडत होती."[२६]

हे एक दर्शन "बिनबुडाचा पाईप" आणि बिनबुडाच्या झोपडपट्टीवासीयांच्या जीवनाचे आहे· गोल पाईपाइतकेच दुःखाचे वर्तुळ आहे· दुःख, दारिद्र्य, अज्ञान, यांचाच या झोपडपट्टीवासियांच्या जीवनात पाठशिवणीचा खेळ आहे· जो या निष्पाप मुलांच्या जीवनात भविष्यात येणार आहे· या दुःखाच्या वर्तुळात सामान्य माणसांचे जीवन कचराकुंडी झाली आहे, टाकाऊ ठरले आहे, एवढेच नव्हे तर त्याच्या मुलाचे भविष्यही असेच पोकळ आहे, त्याच्या वाटयास कधी हिरवीगार बाग आलीच नाही, ती कचराकुंडीच त्याची बाग बनते आहे, त्यामुळे उद्या भविष्यात येणारा समाज हा व्यक्तित्वहीन, मांगल्यांचा अभाव असणारा येईल, ही सारी वाईट फळे विषम समाजरचना, माणूसपणाचा अभाव याची लक्षणे आहेत हे वाचकाच्या मनात अवचटांची लेखणी ठसवून जाते, विचाराचे तरंग निर्माण करून जाते·

ही चार-पाच समूहचित्रे जर शेजारी शेजारी ठेवली तर जाणवते की, अवचटांची लेखणी त्यातील मर्मावर नेमकी बोट ठेवते· या उपेक्षितांच्या जिण्याची हलाखी दर्शविते·

सामान्य माणूस, परिस्थितीने, कधी अन्यन्य कष्ट उपसून, तर कधी विषम समाजरचनेतून, कधी पोटासाठी, कधी स्वतः अज्ञानातून, अंधश्रध्दा परंपरेतून, कधी व्यसनातून, दारिद्र्यातून तो दबला जातो, पिचला जातो. हे वरील उदाहरणांच्या विविधतेवरून स्पष्ट होते· एकामागोमाग एक प्रसंग वाचकांसमोर ठेवत, दबलेल्या माणसाचे मानवी समूहाचे प्रत्ययकारी दर्शन अवचट घडवितात हे स्पष्ट होते· हे प्रत्ययकारी लेखन करीत असताना ते खूप समतोलपणा वावरत असताना दिसतात, काही ठिकाणी तटस्थपणे निर्देश करताना दिसतात, जीवन थिजवणा-या दुःखाचा स्वतःच्या मनावर उमटलेला चरा, अलगद वाचकाच्या हृदयावर उमटावा, तो जखमी व्हावा इतके हे ललित लेखन प्रत्ययकारी झाले आहे· त्यामुळे "'माणसं' वाचताना, त्यांची सुखदुःखे पाहताना वाचक त्यांच्या इतका जवळ जातो की, त्यांच्या अनुभवाचे रूप केवळ "वाचनाचा अनुभव न राहता तो त्यांच्या वेदनेचा अनुभव बनतो·"[१७] म्हणजेच "माणसं" मधून दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन घडते·

<u>शहरात आलेले खेडे :-</u>

"माणसं"मधील लेखातून अभिव्यक्त झालेले खालच्या वर्गाचे दुःख अर्थपूर्ण आहे· या माणसांच्या वाट्याला हे दुःख, हे उपरे जगणे, ही भटकंती हे सोशीकपण का आले, या सनातन दुःखाची कारणे कोणती, याचा शोध घेताना जाणवते ती इथली

समाजव्यवस्था, या देशातील खेडयांच्या स्वावलंबीपणाचा व शहरांच्या योजनाबध्द विकासाचा अभाव· त्यामुळे शहरांच्यात झोपडपट्टी प्रचंड प्रमाणात वाढली आहे· स्वातंत्र्यानंतर खेडी स्वयंपूर्ण, स्वावलंबी व्हावीत, त्यासाठी रोजगार उपलब्ध करावेत हा विचार होता, पण तसे घडले नाही, त्यामुळेच दुष्काळामध्ये लोकांना गावे सोडावी लागली, पोट भरण्यासाठी पुण्यासारख्या शहरात कोणत्याही सुविधा नसलेल्या ठिकाणी लोकांनी वस्त्या ठोकल्या नि झोपडपट्टीचा जन्म झाला· सामान्य माणसाच्या वाटयाला स्थलांतर आले, ते खचलेल्या मनाने स्वीकारून तो शहरात आला नि खेडयाचे दर्शन होऊ लागले·

आपल्याकडे वाढणाऱ्या औद्योगिकीकरणाने, यंत्रयुगाची शिस्त स्वीकारली नाही, त्यामुळे रोजगारासाठी, काबाडकष्ट करून जगण्यासाठी खेडयांचा शहराकडे ओघ लागला आणि नवी झोपडपट्टी संस्कृती जन्माला घातली जाऊ लागली· खेडयातून आलेला ओझे उचलणारा माणूस, कधी हमाल नावाचे जनावर बनते हे त्यालाही समजत नाही, या दुष्ट यातना चक्रातून तो सुटतही नाही·

मात्र त्याचा खेडयाचा धागा तुटलेला नसतो, पोटापाण्यासाठी आलेला, आर्थिकदृष्टया गांजलेला हा माणूस शरीराने तो इथे राबतो, पण मनाने मात्र त्याच्या खेडयात असतो· त्याचे कुटुंब, त्याची जत्रा, लग्न समारंभ हे सारे तो त्याच्या गावीच करतो, इथे त्याचे रहाणे, खानावळही गाववाल्याकडे किंवा जिल्हावाल्याकडे असते· म्हणजे तो आपले गावपण सोडत नाही·

औद्योगिकतेनंतर तर खेड्यापाडयातून शहराकडे होणारे स्थलांतर मोठया प्रमाणात वाढले आहे· अज्ञान, अशिक्षितपणा, दारिद्र्य, भांडवल नाही की नोकरी नाही, अशा न्यूनगंडाने पछाडलेला खेडयांचा समूह शहरात येतो· त्यातून शहरवजा खेडयांची एक नवी झोपडपट्टी संस्कृती उदयाला आली आहे·

जगणे अशक्य झाल्यावर हे लोक गाव सोडतात· गाव सोडावे लागल्याने मन खचलेले, उपासमारीने शरीर खंगलेले. शहराकडे धाव घेणाऱ्याकडे असतात आयुष्य ओढत हिंडणारे पाय·

काही ठिकाणी शहरच खेडे बनताना दिसते· "शहरातल्या झोपडपट्टीत चांगल्या परिस्थितीतले लोकही राहतात· त्यांची घरे इतरांपेक्षा वेगळी, जवळच्या कारखान्यात

त्यांच्यापैकी कोणी कामगार असतो, त्यामुळे येणाऱ्या पैशाचाही थोडा परिणाम रहाणीमानावर दिसतो· शहराबाहेर वस्ती असल्याने जागेची टंचाई नाही, घर ऐसपैस, तुळशी वृंदावन, वस्तीत छोटेसे देऊळ, पुढे पार, घरे मातीच्या विटांची व वर कौले घातलेली, त्यामुळे हे चित्र म्हणजे एखादे खेडेच पाहतोय असे वाटते·"[२८] या वस्तीत असेच पोटासाठी शहराकडे धाव घेणारे गाववाले, नातेवाईक, जातवाले यांचा भरणा होतो· त्यामुळे याही ठिकणी भावबंधनांनी जखडलेली छोटेखानी खेडी नांदताना दिसतात·

शहरात येणाऱ्या या खेडयांचा विचार मांडत असताना, शहरातील झोपडपट्टी-वासियांच्या दोन पिढीतील भिन्न मानसिकता अवचट स्पष्ट करतात, "खेडयातून शहरातल्या झोपडपट्टयात जी पहिली पिढी रहायला येते तिचे मन खेड्यात घडलेले असते म्हणून ते नंतर तिथेच गुंतलेले रहाते· आपल्यावर प्रसंग आला म्हणून गाव सोडावे लागले आणि या नरकात येऊन पडावे लागले अशी त्याला बोच असते, पण येताना बरोबर असलेली लहान मुले किंवा इथेच जन्मलेली मुले मात्र या नरकात वाढतात, हे वातावरण त्यांच्या दृष्टीने नेहमीचे, स्वाभाविक वातावरण असते· विष्ठेच्या तळयाकाठी वसलेल्या त्या झोपडयांमधल्या लहान मुलांना घाणीची घाण तरी कशी वाटणार ?"[२९] हा प्रश्न वाचकाच्या मनात भविष्यकालीन संस्कृतीविषयी धोक्याची सूचना देऊ लागतो· ही झोपडपट्टी अशीच वाढत राहिली तर त्या लहान मुलांचा पुढे तो जीवनाचा भाग बनेल, जीवनमार्ग होईल, एक विचित्र मिश्र संस्कृती, मांगल्यहीन जीवनमूल्ये उदयाला येतील याची शंका लेखकाला येते·

हे थांबले पाहिजे, थोपविले पाहिजे, त्यासाठी झोपडपट्टीवाल्यांच्या समस्या अग्रक्रमाने सोडवल्या पाहिजेत· विशिष्ट दृष्टीने आखलेली आर्थिक धोरणे, समाजव्यवस्थेतील पूर्वापार चालत आलेली सदोष रचना न बदलणे, दुष्काळग्रस्तांसारख्या पिडितांसाठी शासकीय रोजगार योजनांची, जलसिंचनाच्या प्रकल्पांचे नियोजन नसणे, गावपातळीवरील सामाजिक छळवाद न थांबणे अशा अस्थिर, असुरक्षित भावनांच्यामुळे लोक खेडी सोडून शहरात धावतात· शहरात रहाण्यासाठी जागेचा प्रश्न निर्माण होतो, त्याचे पर्यायी उत्तर म्हणून झोपडपट्टीची निर्मिती झाली आहे, ती सारखी वाढते आहे· हा ओघ थांबवण्यासाठी खेडी सशक्त केली पाहिजेत· ग्राम विकास पातळीवरील रचनेतील मूलभूत दोष काढून टाकले पाहिजेत· सरकारसह सर्वांनी झोपडपट्टी सुधारणेसाठी सातत्याने

झटले पाहिजे नाहीतर हा शहराकडे धावणारा खेडयांचा लोंढा असाच चालू रहाणार आहे.

विसंगती हेरण्याचे कौशल्य :-

आपल्या सामाजिक जीवनातील दांभिकतेचे वाभाडे काढून त्यातील विसंगतीचा वेध "माणसं" या पुस्तकात अनिल अवचटांनी ठिकठिकाणी घेतला आहे.

समाजातील परस्पर विरोधी अशी दोन चित्रे स्वच्छपणे वाचकांसमोर मांडून मानवी जीवनातील विसंगतीचे दर्शन अवचट घडवितात, त्यामुळे त्यांच्या लेखनातील आशय नि अभिव्यक्तीची वीण अधिक घट्ट होते.

"माणसं" या पहिल्या लेखात, पहिल्या परिच्छेदातच विसंगती मांडली आहे आणि तीही वास्तव परिस्थिती आहे. "सर्व भारतातील स्वच्छ स्टेशन" असे पुणे स्टेशनला मिळालेले पारितोषिक, त्याच स्टेशनच्या तिस-या वर्गाच्या वेटींग रूम व समोरील पटांगणात दुष्काळग्रस्त माणसांचा खच पडलेला, या पार्श्वभूमीवर जेव्हा राष्ट्रपती येणार तेव्हा त्या निराधार माणसांची शासनाकडून सोय करण्याऐवजी पोलीस त्यांना हाकलून लावतात व राष्ट्रपतींचा रस्ता स्वच्छ करतात. इथेच अवचट नेमके बोट ठेवतात, विसंगती दर्शवतात, अशा त-हेने राष्ट्रपतींचा मार्ग स्वच्छ होणार नाही, तर हे वास्तव त्यांना दाखवून त्या पीडित माणसांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे याचा शासकीय यंत्रणेने कधी विचारच केला नाही, त्यांना त्याची आवश्यकताही वाटत नाही, केवढी विसंगती आहे, किती काळ या देशाचे राष्ट्रपती अशा खोटया, स्वच्छ रस्त्यावरून जाणार आहेत, ही समाजजीवनातील विसंगती विषमतेची दरी वाढवणारी आहे.

या हाकलल्या जाणा-या भटक्या माणसांना कोठेही निवारा नाही. त्यांच्यासाठी "रिझर्व्ह" अशी जागा नाही. आणि दुस-या बाजूला महिन्या-महिन्याचे रेल्वेचे रिझर्व्हेशन करण्यासाठी लागलेल्या प्रचंड रांगा पाहून अवचट म्हणतात "माझ्या समोर होती ही सगळी अन्-रिझर्व्हर्ड माणसे. यांना वेळ "वाचवायचा" प्रश्नच नाही. यांना या जगात कसाबसा वेळ "काढायचा" होता."[३०]

या उघडया पटांगणातील उघडया कुटुंबातील मुलांचे खळखळून हसणे सुध्दा या पार्श्वभूमीवर विसंगत वाटते, अस्वस्थ करते कारण त्या हास्याला भविष्यात तसेच

रहाण्याची तसूभरही आशा नाही हे स्पष्ट आहे· एका बाजूला शहरात पोटपाण्यासाठी येणा-यांच्या झोपडपट्टया वाढताहेत, तर दुस-या बाजूला गणपती उत्सवाची झगमगाटाची, आरसाची तयारी चालू आहे· सर्व गणपती प्रकाशाने चमकत आहेत· तेव्हा या वस्त्यांमधून अंधाराचे साम्राज्य वाढते आहे· कार्यकर्ते उत्सवासाठी वर्गणी गोळा करताहेत तेंव्हा दुष्काळग्रस्त पोटासाठी भीक मागत फिरत आहेत·

मिरची गुदामातील धुरळ्यात तेथील हमालाच्या अंगाचा दाह होतो पण कोणी त्याला विचारत नाही, पण गुदामाचे दार उघडले तरी वरच्या मजल्यावरच्या बाईचा त्या वासाने खोकून जीव जातो·

वर्षाकाठी कुटुंबासह सहलीला जाण्यासाठीचे भाडे घेणाऱ्या रेल्वे अधिकाऱ्यांना हमालासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी असे वाटत नाही·

समाजातील "रॅडिकल लेफ्टीस्ट" म्हणवणारे क्लबात गप्पा मारतात, यांच्या स्त्रिया केशभूषा ते लोणचं यावर चर्चा करतात· कितीतरी शिकलेल्या स्त्रिया अशिक्षित समाजाला आपल्या शिक्षणाचा उपयोग करून द्यावा असा विचार न करता सिनेमाची मासिके चाळत लोळत पडतात, इथे लेखक विसंगती स्पष्ट करतो कारण वरच्या वर्गातले इतके शिक्षण की ज्याचा उपयोग समाजाला त्यांनी मनात आणलं तर सहज होवू शकतो ते शिक्षण वाया चालले आहे आणि दुस-या स्तराला शिक्षणाचा पुसटसा स्पर्शही होत नाही· अशी ज्ञानाच्या बाबतीत सुध्दा आपल्या समाजात विसंगती आहे·

निपाणीतील बिडी-कामगार दहा पैशाला, जगायला महाग, पण त्यांच्या जीवावर उडया मारणा-या व्यापारी कारखानदारांच्या कॅडिलॅक, मॉर्सेडिश इत्यादी मोटारगाडया-साठी निपाणीत अतिशुध्द पेट्रोल मिळते व परदेशातच मिळू शकते अशी महागडी दारूही निपाणीत मिळते·

अशा या विसंगतीपूर्ण समाजजीवनात प्रत्येकाला स्वतःचे जीवन महत्वाचे वाटते आहे· त्यासाठी इतरांचे शोषणे आपणाकडून केले जात आहे याची खंत नाही· आपण माणूस आहोत, सभोवतीही माणसं आहेत· सहजीवन जगणे गरजेचे आहे· ज्यांना पोटभर खायला मिळत नाही· त्यांच्यासाठी काही करणं हे सुसंवादी जीवनाचं लक्षण आहे, संस्कृतीला पोषक आहे· समाजातल्या सुस्थित वर्गाने हा विचार केला नाही तर

माणसाची पातळी खालच्या कोणत्या अवस्थेपर्यंत पोहचेल याची कल्पना करता येणार नाही· समाजजीवन निकोप रहाणार नाही· गुन्हेगारी पध्दतीची झोपडपट्टीय संस्कृती एकदा वाढली तर आज समाजजीवनात ज्याची आपण विसंगती म्हणून नोंद करतो, तीच विसंगती जीवनमूल्यांची सुसंगती बनेल आणि मग माणूस "माणूस" रहाणार नाही· सूक्ष्म निरीक्षणातून असं हे विसंगतीपूर्ण मानवी जीवन अवचटांनी "माणसं"मधून अभिव्यक्त केले आहे·

<u>अन्याय करणारे नि सोसणारे असे एकसंघ चित्र :-</u>

अवचटांच्या "माणसं" मध्ये अन्याय करणारे नि सोसणारे असे समाजजीवनाचे एकसंघ चित्र आलेले आहे· विचारांची पक्की बैठक, दुर्लक्षित मानवसमुहाच्या जीवनाचा वेध घेण्याचा निश्चित दृष्टीकोण असल्यामुळे अनिल अवचट भविष्यात येणा-या गंभीर परिस्थितीची ओळख करून द्यावी, यासाठीच "माणसं" मध्ये ते विषम समाजरचनेचे, अन्याय करणारे नि सोसणारे यांचे एकसंघ चित्र रेखाटतात· उदा··

"टिकटी नाहीत उतरा खाली ।" बरं बुवा उतरतो", "भडव्या चाललास कुठं ? काय आहे दाखव गठुडयात ?" "साहेब, काय नाय· पोराला भुकेला द्यावं म्हणून एक किलोभर शेंगा आहेत बघा·" पर त्यानं ते हिसकावून घेतलं· मी म्हटलं "पोराच्या तोंडचं नका ओढू । तर तो म्हणतो कसा, "साल्यांनो तुम्हाला फुकट जायला पाहिजे गाडीनं· बापाचीच गाडी आहे ना तुमच्या ।"[३१]

परिस्थितीने गांजलेल्या दुष्काळग्रस्ताला साधी "माणूसपणाची" भावना ही त्या अधिका-याने न दाखवता त्याच्या पोराच्या तोंडचा घास काढून घेतला·

"खेडयापाडयात फिरून पोट भरणा-या भटक्या जमातीही अलिकडे शहरात येऊन स्थिरावत आहेत· खेडयात पोट भरत नाही· परत गाववाल्यांचा त्रासही खूप असतो· यांची पाले गावाबाहेर असतानाच्या काळात गावात कुठे चोरी झाली की शहानिशाही न करता गाववाले यांना बेदम चोपतात, मुलीबाळींच्या अब्रुची शाश्वती नसते· त्यापेक्षा शहरात पोटही भरता येते आणि अधिक सुरक्षितपणाही मिळतो·"[३२]

इथे अन्याय करणारा समूह आणि सोसणारा समूह यांचे एकसंघ चित्र समोर येते·

"मालकाला चांगल्या स्त्रिया मिळवून देणं हाही चेकरच्या ड्यूटीचाच भाग असतो. अशा स्त्रियांनी आधी जास्त छाट विडी काढून किंवा विडयांसाठी तंबाखू कमी देवून रडवेले करतात. ती तक्रार करू लागल्यावर म्हणतात, 'जा मालकाला जाऊन भेट', मालक कुठे आहेत तर वखारीत. न जावे तर काम जाईल, जावे तर तिकडे काय होईल ते सांगता येत नाही, अशा कात्रीत त्या सापडतात. काही स्त्रिया अशा कोंडीतून मालकाकडे जाणे पसंत करतात. तिला त्या बदल्यात विडीसाठी तंबाखू जास्त मिळू लागते. तिची छाट विडी निघेनाशी होते. तिच्या या संबंधाची नव-याला किंवा घरच्यांना कल्पना आली असली तरी ते या बाबतीत काही बोलत नाहीत. कारण नाहीतर जास्त काम मिळतय ते बंद होईल ही भीती. मालकाने वापरलेल्या स्त्रिया नंतर चेकर लोक वापरतात. एक म्हातारी स्त्री म्हणाली "जिच्या चेह-यावर पाणी, तिच्यासाठी निपाणी आहे बघा ही."[३३]

असे हे असाह्यतेचा फायदा घेवून अन्याय करणारे व पोटासाठी अन्याय सोसणारे चित्र, समाजमनाचे अधःपतन दर्शविते.

वरील उदाहरणांवरून अन्याय करणारा स्वार्थी, ओरबडणारा, पशुतुल्य असे वर्तन करणारा आहे. मानवतेला काळीमा फासणारा आहे, ना लाज ना शरम असा निर्लज्ज आहे, कोडगा आहे.

तर सोसणारा असहाय्य आहे, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक दृष्टया तो दुबळा आहे. परिस्थिती विरूध्द तो झगडू शकत नाही. जीवन जगत असताना त्याला आवडनिवड नाही. अगदी सोसण्यात सुध्दा त्याला निवड नाही. जे वाटयाला आले असेल ते मुकाटपणे भोगताना दिसतो. अनिल अवचटांची "अनुभव घेण्याची रीत "तुलनात्मक" अशी आहे 'हे चित्र आणि ते चित्र' असं तिचं स्वरूप आहे. ठिकठिकाणी परस्परविरोधी अशा घटना त्यांनी वाचकांपुढे ठेवल्या आहेत"[३४] तरी त्या एकसंध स्वरूपातच वाचकांसमोर येतात.

हे एकसंध चित्र पहाताना माणूस सुसंस्कृतपणा, शहरीकरण, औद्योगिक प्रगती यांचा लाभ उठवत परत कसा रानटी होतो आहे हे सहजपणे वाचकांसमोर उभे राहते.

चित्रकार अवचट :-

"माणसं"मधील सामान्य माणसाचे चटका बसेल असे एकसंघ चित्र रेखाटून वाचकाचे लक्ष या दुर्लक्षित मानवीसमूहाकडे वेधण्याचे कार्य अवचटांच्या अंतःकरणात जो एक चित्रकार आहे त्याने केलेले आहे. या चित्रकारपिंडाच्या लेखकांची भाषा चित्रमयी बनते. त्यांची लेखणी समोर जसे दिसते तसे रेखाटते. समोर जे काम आहे ते करावयाचे, करीत रहायचे अशी त्यांची वृत्ती आहे.

"माणसं" या पहिल्या लेखाची सुरुवातच मोठी चित्रमय झाली आहे. वाचकाला वेधून मुख्य विषयापर्यंत सहज पोहचवते. "पुणे स्टेशनातल्या एक नंबरच्या प्लॅटफार्मवरुन चालत होतो. बाजूला टांगलेली पितळी घंटा सोन्यासारखी चकाकत होती. फस्टक्लास वेटींग रुमकडे जाणा-या हिरवी कार्पेट पसरुन त्यावर ठोकलेल्या पितळी चकचकीत पट्टया उठून दिसत होत्या. पलिकडे भिंतीवर एका शोकेसमध्ये गेली बरीच वर्षे पुणे स्टेशनला "सर्व भारतातले स्वच्छ स्टेशन" म्हणून पारितोषिक मिळाल्याचे फोटो लावले होते."[२५]

वाचकांच्या मनात उमटलेल्या पुणे स्टेशनच्या चित्राने वाचकाची उत्सुकता वाढवलेली असते. तो लेखकाबरोबर पुढे चालू लागतो. तो पुढे माणसांचा ढीग दिसतो, मग हा चित्रकार मानवीमूल्यांचे उभे आडवे फटके या चित्रात उमटवून "माणूस" हा चित्राचा मध्यबिंदू करतो आणि आपण माणूस आहोत मग बरोबरच्या माणसाच्या वाट्याला उपेक्षिताचे जीवन का, हे आपल्याला शोभणारे नाही ही अपराधीपणाची जागती भावना घेवून, दुर्लक्षित, तळागाळातील समाजाची दुःखे हा कलावंत रेखाटू लागतो.

पावसाळ्यात उघडया पटांगणात बायकामुलांसह बसलेले कुटुंबाचे चित्र लेखक एका वाक्यात उभे करतात, "शेळ्यामेंढया जशा एकत्र बसतात तशी ती एकत्र बसली होती."[२६] किंवा गोधडीच्या भोकातून म्हाता-याचा सुरकुतलेला चेहरा दिसत होता तो पाहून अवचट जेंव्हा "मला प्रायोगिक उच्चभ्रू चित्रपटातल्या एखाद्या शॉटची आठवण झाली."[२७] असे लिहून जातात तेंव्हा ते समाजजीवनाचे प्रायोगिक चित्र सुजाण वाचकाला अस्वस्थ करते.

चित्राच्या अगोदर पार्श्वभूमीसाठी जसा एखादा हलका रंग द्यावा तसा अवचट प्रत्येक लेखाच्या सुरुवातीला आपल्या अल्पाक्षरत्वाच्या शैलीत एखादा रंग देतात, मग

त्यावर पुढचे सारे चित्र रेखाटतात उदा."कोण माणसं...कोण जनावरं.." मधील पहिले वाक्य पहा, "पुणे दिवसेंदिवस वाढते आहे."[३८] "पुण्यातली मध्यवस्तीतली भवानी पेठ"[३९]आणि मग तेथील हमाल जीवनाचे चित्र उभे रहाते किंवा "माणसाचे मन मेल्याशिवाय अशा अवस्थेत जीवन रेटणे कठीण आहे."[४०] या वाक्यासरशी हमालांच्या मेलेल्या मनाची स्पंदने जाणवू लागतात. "वस्त्या माणसांच्या" मध्ये "पेशवेकालीन पुणे आता इतिहासजमा झालेले आहे."[४१] याबरोबर औद्योगिकरणातून पुण्यात आलेली झोपडपट्टी, त्या ठिकाणचे जीवनमान याचे दर्शन लेखक घडवितो. "झोपडपट्टी म्हणजे असुरक्षितता"[४२] भविष्यकालीन मानवी संस्कृतीच्या असुरक्षितेचे नेमके चित्र ते वाचकाच्या मनात उभे करतात.

"अनिकेत"ची सुरूवात चित्रमय आहे. जणू चित्रपटातल्या एखाद्या दृश्यावरून "कॅमेरा झुम" होतो आहे असे वाटते. "विस्तीर्ण माळरानावर मध्येच एक टेकडी त्यावर मोठे चिरेबंदी कानिफनाथाचे देऊळ, टेकडीवरून उतरत आलेल्या दगडी पायऱ्याखाली छोटया मढी गावानजिकच्या माळरानावर जत्रेसाठी आलेला लाख-दीड लाखाचा समुदाय एका बाजूला पाले ठोकून किंवा उघडयावर राहिलेल्या भटक्या जमातीच्या लोकांची शेकडो कुटुंबे."[४३] या पार्श्वभूमीवर त्यांचे दारिद्रय, अंधश्रध्दा रीतीरिवाज यात गुरफटून जावून, समाजपरिघाबाहेर जगत असताना होणारे शोषण, मागासपण अस्थिर जीवन याचे चित्रण पुढे संपूर्ण लेखभर येते. लेखाचा शेवट करताना या भटक्यांचे आदिम मानवाशी सांगड घालतानाचे अवचटांनी रेखाटलेले चित्र माणसाला हतबल करणारे आहे. "भटक्यांचे जग पहाताना, हिवाळ्यात बर्फ पडते म्हणून स्थलांतर करीत आपल्या उबदार देशात येणाऱ्या रशियन पक्ष्यांचो किंवा हिरवळीचा शोध घेत हिंडणाऱ्या आफ्रिकन हत्तीच्या कळपांची आठवण होते. हे हत्ती गेली हजारो वर्षे त्याच मार्गाने स्थलांतर करीत मूळ ठिकाणी परत येतात. या भ्रमंतीत एखाद्या वर्षी उन्हाळा खूप कडक लागला किंवा दुष्काळ पडला की कुठले पाणी आणि कुठली हिरवळ ? आधी पडलेले हत्तीचे सांगाडे हुंगत हे हत्ती त्याच मार्गाने पुढे जात रहातात. टिकतात ते जातात पुढे, नाही ते तिथेच हाडे टाकतात."[४४] हे लेखकाचे भटक्यांच्या जीवनाविषयीचे चित्रमय भाष्य वाचकाच्या मनात रुतून बसते.

"गावात शिरल्या शिरल्या तंबाखूच्या धुळीने ठसका येतो, इथली धुळसुध्दा तंबाखूची"[४५] मग त्या मागोमाग मानवी जीवनाची धुळदाण उडवणारा ठसका वाचकाला अस्वस्थ करतो. पावित्र्य, चारित्र्य, शील कधीच गहाण पडते नि एक समाजजीवनातील काळेकुट्ट चित्र दिसते. संस्कृतीची चाड, प्रकाशाचे पूजन करणा-यांना ते एक आव्हान ठरते.

वाचकाच्या मनात विचाराची आवर्तने निर्माण करत, शब्दबध्द आकार घेत चित्रकार अवचटांचे दर्शन "माणसं"मध्ये घडते. "माणसं" या पुस्तकातील "शीर्षके"देखील चित्रमय आहेत.

**कार्यकर्ते अवचट :-**

"माणसं" मधील लेखनात अनिल अवचटांच्या कार्यकर्त्या मनाचे दर्शन घडते. स्टेशनवरच्या थोडयाशा वेगळ्या माणसाचे दर्शन झाल्याबरोबर त्यांच्याकडे जावून ते चौकशी करताना दिसतात. इथेच त्यांच्या कार्यकर्त्या मनाची ओळख होते. ते स्वतः माणसावर प्रेम करणारे आहेत. माणसाला माणसाकडून वाईट वागणूक मिळते याची त्यांना खंत आहे. अपराधीपणाची वेदना आहे. सर्वांनी बरोबरीच्या नात्यांनी आनंदी राहिले पाहिजे. त्यासाठी ही समाजयंत्रणाच बदलली पाहिजे हा त्यांचा आग्रह आहे.

अवचटांचा पिंड कार्यकर्त्याचा आहे म्हणूनच आत्मपरिक्षणासह केलेले "समाजाचे निरीक्षण" या पुस्तकात आढळते. आपल्या कार्यकर्त्यांसह, सामान्य माणसांच्या समस्या पहात असताना ते दिसतात, वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यासाठी, समाजकल्याण खाते, विविध संस्था यांच्याशी संपर्क साधताना दिसतात. त्यांच्याकडे सहृदयता आहे. परदुःख पाहून गहिवरणारे मन आहे. त्यांच्या सजग आणि सच्च्या अंतःकरणाची प्रचिती "माणसं"च्या लेखनात वाचकालाही येते.

दुष्काळग्रस्त, हमाल, झोपडपट्टीवासीय, भटके आणि तंबाखू कामगार ही "माणसं" असून जनावाराचे जिणे त्यांच्या वाटयाला आलेले पाहून अवचट म्हणतात, "त्यांचा निरोप घेताना कधी न पाणावणारे डोळे पाणवायला लागले. स्वतःविषयी घृणाच वाटायला लागली. आपण कुठल्या वर्गात रहात आहोत, किती बोथट झालो आहोत, किती कृतघ्न आहोत, आपला चांगुलणाही किती वांझोटा आहे..."[४६]

या प्रचंड जाणिवेने ते उद्ध्वस्त होताना दिसतात तेव्हा एका मनस्वी, संवेदनशील कार्यकर्त्याचे दर्शन वाचकाला घडते. त्यांचे लेखन, प्रसिध्दीसाठी, फॅशन म्हणून किंवा विचारांच्या थप्प्या म्हणून निर्माण झालेले नाही. वरील उताराच त्यांची वेदना, त्यांचे कार्यकर्तेपण किती प्रांजळ आहे, विलक्षण मनस्वी आहे, विचाराची बैठक आहे, कृतीशिलता आहे, मांगल्याचा ध्यास आहे याची साक्षआहे. म्हणूनच त्यांचे ललित लिखाण समर्थ झाले आहे.

हमाल पंचायतीची स्थापना, भजनांचा सांस्कृतिक सोहळा, फॅसिट यंत्राचे आगमन म्हणजे लेखकाला संस्कृतीची चिन्हे, माणूसपणाची धुकधूक वाटते. या गोष्टींचे तो समाधान व्यक्त करतो.

"आपण स्वतःला माणूस म्हणवत असू तर या दुष्टचक्रात सापडलेल्या प्रचंड मानवसमूहाला आपण समजावून घेतले पाहिजे. झोपडपट्टयात राहणारी माणसे या शहराच्या अनंत सेवा बजावीत असतात हे लक्षात घेऊन त्यांच्या प्रश्नांना अग्रक्रम देऊन ते सोडवले पाहिजेत."[४७] असा अवचटांचा दृष्टीकोण आहे व स्वतःला "रॅडिकल लेफ्टिस्ट" म्हणवणाऱ्यांनी कृतीशिल बनावे हे त्यांचे आवाहन आहे. झोपडपट्टी, भटके यांच्या प्रश्नांची तीव्रता कमी करण्यासाठी कार्यकर्त्यांचे संच निर्माण झाले पाहिजेत, ज्यांना मानवतेच्या भूमिकेतून रस आहे त्यांचेही सहकार्य घ्यावे लागेल याची पूर्ण जाण अवचटांच्या लेखनाला आहे.

"समाजशास्त्रीय स्पष्टीकरणे देऊन हे आजचे प्रश्न सुटणार नाहीत"[४८] याचे भान त्यांना आहे म्हणून मुख्य समाजानेच या दुर्लक्षितांचे जीवनमान पालटण्यासाठी डोळसपणे पाहिले पाहिजे, सहानुभूतीने समजावून घेतले पाहिजे तर त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे सोपे जाणार आहे.

त्यांच्या परिवर्तनाचा विचार करताना लेखक या भटक्या, दुबळ्या वर्गालाही समज देताना दिसतो, व्यसनांच्यामुळे त्यांचे होणारे नुकसान लक्षात घेवून त्यांनी ती सोडली पाहिजेत हे समजावून सांगताना दिसतो. चोरी, गुन्हेगारी, फुकट खाणे असे लाजिरवाणे मार्ग सोडून त्यांनी समाजमान्य मार्गांनी पोट भरले पाहिजे. स्वतःच्या जातीच्या स्वायत्ततेच्या कल्पनेला (उदा.जातपंचायती समोरील गुन्हेगारी प्रकरणे) मर्यादा

घालून, रीतीरिवाज, रूढी यांच्यात बदल केला पाहिजे. भानामती, नरबळी असले अघोरी संकेत टाकून देऊन कायदा पाळला पाहिजे, समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना सामील व्हावे लागेल, या प्रचंड परिवर्तनासाठी मध्यमवर्गियांनी, विद्वानांनी बळ पुरविले पाहिजे ही अवचटांच्या कार्यकर्त्या मनाची विनम्र विनंती आहे.

बुध्दीवादी नोकरदारांच्या संघटना, औद्योगिक कामगारांच्या संघटना त्यांनी आपले पोट भरल्यानंतर तरी विचार करावयास हरकत नाही, एका माणसाने आपल्यापेक्षा वाईट परिस्थितीत असलेल्या माणसाला हात देणे हे तर साधे माणुसकीचे तत्त्व आहे, मग या संघटना असुरक्षित कामगारांना, संघटनांना मदत का करीत नाहीत ? मानवी हक्कासाठी का झगडत नाहीत ? या प्रश्नांचा वेध घेत, आवाहन करत, कृतीशिल कार्य करण्याची तयारी असलेल्या कार्यकर्त्या अवचटांचे लेखन वास्तव, भावभावनांचा आविष्कार करत ललित लेखनाला प्रत्ययकारी बनवते.

विविध संदर्भ :-

पारंपारिक, ऐतिहासिक, राजकीय, वृत्तपत्रीय संदर्भ जीवन समृध्द करतात पण येथे हे संदर्भ या उपेक्षितांची हलाखीच वाढवतात. परंपरेविषयी प्रचंड अज्ञान, ती ते सोडू इच्छित नाहीत. उदा. "अनिकेत" लेखामधील वडार स्त्रिया कधी चोळी घालत नाहीत याला पौराणिक संदर्भ असा की या वडार स्त्रिया सीतेच्या वंशाच्या, चोळीच्या हट्टामुळे रामायण घडले म्हणून सीतेने तिच्या या वंशजांना चोळी न घालण्याची शपथ घातली अशी गोष्ट आहे, आज कार्यकर्त्यांनी उपोषण करून ही गोष्ट चुकीची आहे हे समजावून सांगूनही त्यांच्यात बदल होत नाही इतका या संदर्भांचा परिणाम या उपेक्षितांच्या जीवनात आहे.

"लमाण" जमातीचे "बंजारा" हे स्वतःला राणा प्रतापचे वंशज समजतात, त्यामुळे चितोडच्या पराभवापासून त्यांनी खूप कडक रिवाज घालून घेतलेले दिसतात. उदा. मुख्य गावात रहावयाचे नाही. (रात्र काढावयाची नाही.) अंगावर नवे कपडे घालायचे नाहीत. नवे कपडे आणून, फाडून परत जोडून घालावयाचे. स्त्रियांनी पारंपरिक पोशाखच घालायचा, गवतावर झोपावयाचे, दिवा लावायचा नाही, मोगल सैन्यापासून वाचण्यासाठी स्त्रियांनी स्वतःला कुरूप करून घेण्याची प्रथा, हे सारे आता सोडा, असे पंतप्रधानांनी आवाहन करूनही त्यांच्यात बदल होत नाही.

"भोई" समाज आपणाला काळेबिद्रे म्हणून हिणवतात याचे उत्तर आपण स्वच्छ, नीटनीटके राहून न देता, "मत्स्यगंधेचा" पौराणिक संदर्भ देताना दिसतात, ते म्हणतात तुम्ही उच्चवर्णीयांनी आमच्यातल्या चांगल्या वस्तू नेमक्या उचलून घेतल्या मग आम्ही काळेबिद्रच रहाणार, याचा अर्थ यांच्यात मानसिक परिवर्तन होत नाही हेच लेखकाने इथे नोंदविले आहे·

राजकीय संदर्भ पाहिले तर या राजकारणी लोकांनादेखील या उपेक्षित समाजाकडे लक्ष द्यावे असे वाटत नाही· उस्मानाबाद, लातूर येथून पुण्यात येणाऱ्या दुष्काळग्रस्तांना थोपविण्यासाठी शासकीय योजना नाहीत, असल्याच तर ठीक राबवल्या जात नाहीत· रोजगार हमी योजना पाटलांच्या घराकडे, नातेवाईकाकडे जाताना दिसते· हमालासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होत नाही· त्यांच्या मागण्या मांडण्यासाठी, संघटना बांधण्यासाठी कोणते कायदे नाहीत, कायदे करण्यासाठी राज्यकर्ते पक्ष तयार नाहीत, संघटीत लढाही उभा राहू देत नाहीत· एकंदर या शोषित, उपेक्षित लोकांच्याकडे, त्यांच्या प्रश्नांकडे गांभिर्याने बघण्याची राजकारण्यांची वृत्ती नाही·

हमालीच्या कामावर मरणा-या हमालाला भरपाई नाही, भटक्या जमातीच्या स्त्रीच्या ढुंगणात भर दिवसा भर रस्त्यावर पोलिस दांडा घालतात· पारध्यांना चोरीच्या खोटया आरोपावरून पोलिस बदडून काढतात याची दखल ना शासनात ना प्रशासनात·

कर्नाटक शासन संपूर्ण डोळे झाक करून निपाणीचा विकासच थांबवताना दिसते· महाराष्ट्राचे कायदे कर्नाटकापेक्षा थोडेफार पुरोगामी आहेत म्हणून महाराष्ट्र हद्दीतील सगळा तंबाखू व्यवसाय, कारखाने, व्यापारी, कारखानदारांनी निपाणीत हलविला· कर्नाटक शासनातील संबंधीत मंत्र्यांना विकत घेऊन हे व्यापारी इकडे बिडी- स्त्री-पुरूष कामगारांचे आर्थिक, शारीरिक, मानसिक प्रचंड प्रमाणात शोषण करतात· याची दखल कोणताच राजकारणी घेताना दिसत नाही· त्यामुळे शारीरिक अत्याचाराचे प्रकार शांतिनिकेतनमध्येही घडतात, पुण्या-मुंबईत घडतात असे म्हणणाऱ्या व्यापाऱ्यांना, राज्यकर्तेच निर्लज्जपणे समर्थने देताना दिसतात· "वृत्तपत्रे" ही संपूर्णतः भांडवलदारांची बाहुली असतात· त्यांची पोटे चालतात ती व्यापारी, कारखानदारांच्या जाहिरातींच्यावर. पोलिसांच्या सहानुभूतीवर. त्यामुळे पोलिस स्टेशन सांगेल तशी बातमी ते छापतात· एखादा हमाल मेला तर दोन ओळीची बातमी छापणारी ही वृत्तपत्रे पांढरपेशा वर्गात जरा काही घडले की वादळे उठवतात· वृत्तपत्रे सनसनाटी भावूक विषयाला महत्त्व

देतात· त्यापेक्षा त्यांनी सामाजिक बांधिलकी मानून उपेक्षितांच्या समस्या मांडाव्यात, शोषितांच्यावरील अत्याचारास, अन्याय छळवादाला तोंड फोडले पाहिजे· मानवी हक्कांसाठी वृत्तपत्रांनी झगडले पाहिजे अशी लेखकाची भूमिका आहे· ✓

## भाषाशैली :-

अनिल अवचटांच्या "माणसं" मधील भाषाशैलीचा विचार करताना तिची म्हणून स्वतःची एक वेगळी छाप आहे, वेगळे वैशिष्ट्य आहे· तशी सुरुवात "रिपोर्टाज्" लिखाणाने करणारा हा लेखक, पण त्याच्या सहृदयतेने, वेदना टिपणाऱ्या गहिऱ्या मनामुळे, विचारांच्या बैठकीमुळे, चिंतनशील, शोधक दृष्टीकोण व मानवी जीवनमूल्यांच्या ध्यासापुढे अवचटांच्या भाषेला ललित गद्याचे स्वरूप सहज प्राप्त झाले आहे·

नानासाहेब गोरे अवचटांच्या भाषाशैलीबद्दल म्हणतात, "तुमच्या भाषेत मनाला चटका बसेल अशी धग आहे, वाचकाला बरोबर ओढून नेईल असा तिचा ओघ आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिच्यापाशी परदुःख पाहून गहिवरणारे मन आहे· समाजातील सांदी-कोपऱ्यात पडून राहिलेल्या अनेक जाती, जमाती व मानवसमूह यांचे तुम्ही मराठी वाचकाला प्रथमच दर्शन घडवित आहात आणि त्यांच्या समस्यांचे स्वरूप समजावून सांगता आहात·"[४९] या प्रस्तावनेतील विचार अवचटांचा दृष्टिकोण आणि भाषाशैली यांची एकरूपता, सामर्थ्य स्पष्ट करावयास पुरेसा आहे·

## नित्याच्या जीवनातील भाषा :-

अवचटांची भाषा ही नित्याच्या जीवनातली साधी, सोपी, सुटसुटीत अशी आहे· तिच्या अल्पाक्षरत्वात आशयघनतेचे मोठे सौंदर्य आहे· अचूक, नेमकेपणाचे तिचे वैशिष्ट्य आहे· उदा· "तिथे माणसांचा खच झालेला होता·"[५०] "खेडेगांवी फेटे, स्त्रियांची लुगडी पाहून ही मंडळी नेहमीची वाटत नव्हती·"[५१] या अल्पाक्षरांत संपूर्ण दुष्काळग्रस्तांचे चित्र मांडतात· जगण्यासाठीच्या प्रवासात त्यांचे गाव सुटले आहे हे समजल्यावर ते अंतःकरणाला हात घालेल असं भाष्य करतात· "लोक परगावी लग्नाला जातात, शिक्षणाला जातात, नोकरी शोधायला जातात किंवा हवा पालटायला जातात, ही माणसे कसेही ✓करून जिवंत रहाणे एवढयाच उद्देशाने इथे आली होती·"[५२] या भाष्याबरोबर या माणसांच्या हलाखीचे वर्णन संपूर्ण लेखभर व्यापून जाते·

अनिल अवचटांची भाषा माणसांच्या अंतरंगात खोलवर पोहचणारी आहे· त्यामुळे ओढणारे पाय घेऊन हिंडणारा दुष्काळग्रस्त भजन ऐकून तिथेच घटका दोन घटका बसतो· त्याच्या मनातल्या दुःखाचा स्त्रोत लेखकाच्या शैलीतून स्त्रवू लागतो, "तो काय विचार करीत असेल ? कुठे आपले गाव, कुठे आपण, काय आपली ही वणवण· कुठवर चालणार आहे, हे सगळं···"[५३] सामान्य गरीब माणसांची ही ससेहोलपट व्यक्त करणारी भाषा मनाला चटका लावते किंवा भंगार मिळवण्यासाठी उखणलेले खड्डे पाहून अवचटांना ऐतिहासिक शोधासाठीच्या उत्खननाची आठवण होते· ही जगण्यासाठीची माणसाची अगतिकता पाहून त्यांची भाषा चिंतनशील भाष्य नोंदवते· "तो ही शोधच आणि हाही शोधच"[५४] या एका वाक्यात·

जेव्हा जेव्हा समाजात मानवीमूल्यांना छेद देणारी दृश्य अवचटांना दिसतात तेव्हा तेव्हा ते अस्वस्थ होतात· त्या छेदातील बारीकसारीक तपशील तपासतात, त्यातील विसंगती हेरतात व समाजासमोर मोठया तटस्थपणे विचारासाठी ठेवतात· उपेक्षितांच्या जीवनाचा वेध सहृदयतेने, त्यांच्या जीवनात खोलवर उतरून घेताना ते दिसतात·

"जिथे वाडवडील राहिले ते गाव सोडावे लागले म्हणून मनही खचलेले"[५५] ही सामान्य माणसांच्या मनाची वेदना, 'माणसाचे मन मेल्याशिवाय अशा अवस्थेत जीवन रेटणे कठीण आहे"[५६] हा जीवनाचा तिटकारा, "एखादी राजकीय जाणीव उत्पन्न व्हायला ही किमान आर्थिक कुवत असावी लागते"[५७] असं हे प्रचंड दारिद्र सामान्य माणसांच्या जीवनाची सुभाषिते असावीत अशा पध्दतीने लेखांच्यात येतात, वाचकाला अस्वस्थ करतात, कधी माणूस म्हणून जगण्याचा उपहास करतात· मानवी संबंधच क्षीण होताना, ज्या समस्या निर्माण झालेल्या आहेत· त्या टीकाकारांच्या शैलीतून न मांडता, मोठया आत्मीयतेने ते मांडतात· ही सुभाषिते प्रत्यक्ष अनुभवातून अवतरलेली आहेत, त्यामुळे ती चैतन्यपूर्ण वाटतात, वि·स·खांडेकरांच्या लघुनिबंधातही सुभाषिते येतात· पण अवचटांची सुभाषिते अधिक जीवनसन्मुख आहेत असे म्हणावेसे वाटते·

**संवादावर भर :-**

अवचटांच्या भाषाशैलीचा विशेष म्हणजे ते संवादावर भर देतात. मानवी जीवन विसंवादापेक्षा सुसंवादी बनावे हा त्यांचा ध्यास आहे· संवादाने माणसांना माणसांची वेदना समजेल, समस्या समजेल व त्या दूर करणे शक्य होईल, सहानुभूतीच्या विचारपुसीमुळे

त्याचे उपरेपण, उपेक्षितपण, बेवारशीपण निघून जाईल व समाजात एक सहजीवन, आनंदाचे वातावरण निर्माण होईल· उदा·

"कुठल्या गावाहून आलात ?" म्हणून विचारले ते बोलेचनात· मी विचारले "माझी भाषा कळते का ?" एकाने मान हलावेली· दुसरा मागच्या मागे पळाला मी पहिल्याला विचारले "इथे कधी आलात ?" तो कसाबसा म्हणाला "दोन दिवस झाले", "कुठनं आलात ?" "उस्मानाबादहून·"[५८]

शहरात आलेल्या माणसांच्या या ढींगाला कोणी विचारणारे नव्हते· त्यांची समस्या समजावून घेणारे कोणी नव्हते, हाकलून लावणारे रागावणारेच जास्त· त्यामुळे घाबरलेली माणसं भडाभडा आपलं दुःखही व्यक्त करत नाहीत· समोरच्या माणसावर त्यांचा विश्वास नाही· पण लेखकाने जेव्हा त्यांना विश्वास दिला तेव्हा त्यांनी आपली दुष्काळाने झालेली दशा सांगितली· अशा तऱ्हेने मानवी मनाशी संवाद साधत त्याच्या भावविश्वात लेखक प्रवेश करतो·

"उदागे म्हणाले, "फरशीत काम करणाऱ्याचे हात बघा तुम्ही" म्हणून त्या तरूण हमालाचे तळहात दाखवले· मी पाहिले तर सगळीकडे घट्टे पडलेले होते· उदागे म्हणाले, "लांबून पाहू नका, हात लावून पहा·"

मी त्या तरूणाचा हात हातात घेतला· बोटे चाचपून पाहिली· त्यात मांसल, लुसलुशीत काही राहिलेच नव्हते· हातात लाकूड धरल्यासारखे वाटले· तेवढयात उदागे म्हणाले, "काय लाकुड झालंय की नाही अगदी ?" माझ्या मनातला शब्द त्यांनी म्हटला होता ।

त्याच्या हातांचा तो स्पर्श मनावर चरा उठवून गेला· आपल्या जीवनात आपण फुलाच्या पाकळीवरून, लहान मुलीच्या कोवळ्या गालावरून, स्त्रीच्या ओठावरून, अलगद हात फिरवतो· या तरूण हमालाच्या लाकडी हातांनाही अलगद हळुवारता कशी अनुभवता येणार ।"[५९]

वरील संवादातून राबणाऱ्या माणसाचे शरीरच नव्हे तर भावनांचे विश्वसुध्दा करपून जाते, हाताची लाकडे होतात, संवेदनाच हरवते· हे विदारक चित्र लेखक संवेदनशील वाचकापुढे मांडतो· लेखकही हे बोथट हात लांबूनच पहातो आहे, उदागे म्हणतो,

"लांबून पाहू नका, हात लावून पहा" लेखक हात लावून पहातो नि करंट फिरावा तशी संवेदना जागी होते तेव्हा उदागे आणि अवचट या दोन माणसांच्या मनाची प्रतिक्रिया "काय लाकूड झालय" या एकाच शब्दात प्रकटते· म्हणजे सगळ्याच माणसांची मने सारखीच संवेदनशील असतात फक्त त्यांना हवी स्पर्शाची गरज, सहानुभूतीची दृष्टी म्हणजे एकाच्या हाताचा स्पर्श दुस-याच्या मनावर चरा उमटवू शकतो, त्याच्या भावविश्वातील हळुवारतेच्या अनुभवाचे काय? हे प्रश्न उमटवू शकतात, दुस-याच्या दुःखाची प्रचिती आणून देणारी किंवा त्या दुःखाकडे हळुवारपणे वाचकाचे लक्ष वेधणारी, वाचकाला विचाराला प्रवृत्त करणारी, त्याच्याही हृदयावर चरा उमटवणारी अवचटांची लेखनशैली ललित गद्याला समर्थ करते·

विडी कामगार अमीरचा डॉक्टरशी झालेला संवाद डोके सुन्न करणारा आहे· टी·बी·ने मेलेल्या त्याच्या लहान मुलाचा देह ताब्यात घेण्यासाठी गेल्यानंतर डॉक्टर अमीरला म्हणतो, "सव्वाशे रूपये बील टाका तरच प्रेत मिळेल" मी त्याला म्हणालो, "बाबा, सव्वा रूपायासुध्दा जवळ नाही, सव्वाशे कुठून आणू ? मला या गावात उसने पैसेसुध्दा कोणी देणार नाही· इतके लोकांचे आधीचे पैसे मी देऊ शकलो नाही· तसं डॉक्टर म्हणाला, "मग तू आम्हांला तुझं रक्त दे, या मुलाचे आम्हांला पाहिजे ते अवयव काढून घेऊ दे, मग प्रेत मिळेल", जिवाचा दगड करून तसं करू दिलं, तेव्हा प्रेत मिळालं, पुढं मेव्हणीही गेली, मग मिरज सोडलंच·"

"का सोडलं ?"

"जिथं आपलं लाडकं पोर गेलं, तिथल्या गावात रहावसंच वाटेना· तिथून इकडं निपाणीला आलो·"[६०]

या सामान्य माणसाच्या आयुष्य थिजवणा-या दुःखाला पाहून वाचकही सुन्न होऊन जातो·

अवचटांच्या या सा-या चित्रणशैलीत समतोल आहे, तटस्थता आहे आणि खूप मोठी सूचकताही आहे· काही वेळा अवचट भाष्य न करता प्रसंगामागून प्रसंग वाचकांसमोर ठेवतात आणि त्यातून झिरपणारा मानव्याचा विचार नेमकेपणाने वाचकापर्यंत पोहोचवतात· त्यासाठी त्यांच्या खास शैलीचा अवलंब प्रभावीपणे करतात· अशा विविधप्रकारे

स्वतःची वाट शोधात येणारी अवचटांची ललित लेखनशैली वाचकाची मानवी जीवनाविषयीची "जुगुप्सा" वाढवणारी आहे, उपेक्षितांच्या जीवनाची वेध घेणारी, सहृदय, सूक्ष्म समाजनिरीक्षण असणारी चिंतनशील अशी शैली आहे· जीवनातील आनंदमूल्य जपणारी, वाचकाला खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य असणारी आणि अंतर्मुख बनवणारी अशी वैशिष्टये घेवून अवचटांची लेखनशैली "माणसं"मध्ये अभिव्यक्त होते·

अनिल अवचटांच्या "निवेदन पध्दतीतील मोकळेपणामुळे लेखक-वाचक यांच्यातील अंतर झपाटयानं कापलं जातं· व्यक्ती आणि परिस्थितीच्या संदर्भातल्या स्वतःच्या प्रतिक्रिया व्यक्त करत आशयामध्ये रंग भरणे हे अवचटांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये आहे· राग, द्वेष, सूड, करूणा, अगतिकता अन्यायाच्या दलदलीतही सामान्य माणसांच्या मनामध्ये जागी राहिलेली माणुसकी आणि त्याची अन्यायाविरूध्द लढण्याची जिद्द, अशा विविध रंगी भावनांचे इंद्रधनुष्य अवचटांच्या लेखनात झुलत असते· या भावात्मकतेमुळे आणि मूल्यगर्भतेमुळे सामाजिक तपशीलांनी भरलेले त्यांचे लेखन लालित्यात कुठे कमी पडत नाही· प्रथमपुरूषी आत्मनिवेदनाचा फार्म अवचट मोठया सामर्थ्याने हाताळतात· या पध्दतीचे दर्जेदार लेखन करणारे ते मराठीतील एकमात्र लेखक आहेत·"[६१]

अंजली सोमण यांच्या या प्रतिपादनाशी सहमती दर्शवावी असे त्याचे आशय व अभिव्यक्ती संपन्न ललित गद्य लेखन आहे·

"ललित"च्या १९८० मधील काही खास पुस्तके या वार्षिक चाचणी निष्कर्षामध्ये २८ मतांनी "माणसं" पहिले सर्वाधिक वाचकप्रिय पुस्तक ठरले होते, ही अनिल अवचटांच्या दर्जेदार ललित गद्य लेखनाला रसिकांकडून मिळालेली पावती आहे·

निष्कर्ष :-

"माणसं" मधील अनिल अवचटांचे ललित लेखन हे दुष्काळग्रस्त, हमाल, झोपडपट्टीवासीय, भटके आणि निपाणीमधील विडी कामगार स्त्री अशा उपेक्षित, शोषित, समाजपरिघापासून दूर केलेल्या, दुर्लक्षित "माणसांच्या" जीवनाचे वेध घेणारे आहे· या माणसांना जगावे लागणारे हलाखीचे, पशुतुल्य जीवन ज्या समाजाने त्यांना बहाल केले आहे, त्या समाजाचे आपणही एक घटक आहोत· माणूस म्हणून आपल्याला शोभणारे नाही, ही अपराधीपणाची भावना "माणसं"मधील प्रत्येक लेखातून अभिव्यक्त

होते· मुखपृष्ठे, शीर्षक, रेखाचित्र, अर्पण पत्रिका, प्रस्तावना यातून लेखकाच्या माणसां-विषयाच्या जाणिवेच्या सूचना मिळतात· आपण स्वतःला माणूस म्हणवत असू तर या दुष्टचक्रात सापडलेल्या मानवसमूहाला आपण समजावून घेतले पाहिजे, त्यांच्या प्रश्नांना अग्रक्रम देऊन ते सोडवले पाहिजेत हे भान निर्माण करण्यासाठी अनिल अवचट वाचकांसमोर समाजजीवनाचा आरसा उभा करून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांचा अभाव असल्यामुळे माणूसपण कोमेजून टाकणारी व्यवस्था अधिक प्रबळ होत आहे· या वास्तवाचे चिंतनाभिमुख दर्शन घडविणारे अवचट, या सामान्य माणसांचे जीवनाविषयीचे प्रचंड अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज त्यांना कसे अधिकच हलाखीच्या परिस्थितीत रुतवतात याचे वर्णन करतात· दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन घडविणारे हे लेखन शहरात येणा-या खेड्याची, राजकीय, आर्थिक, सामाजिक अशी कारणमीमांसा करून, समाजामध्ये निर्माण झालेल्या विसंगतीचे दर्शन घडवते· या ठिकाणी सोसणारा, असहाय्य माणूस मुकाटपणे वाटयाला जे आलेले आहे ते तो भोगतो आहे· अन्याय करणारा, स्वार्थी, ओरबडणारा, पशुतुल्य वर्तन करणारा असा असल्याचे एकसंघ चित्र कार्यकर्ते पिंडाचे अनिल अवचट आपल्या खास चित्रमय कथन अशा गतीमान शैलीत विविध संदर्भासह "माणसं"मध्ये रेखाटतात· अनिल अवचटांची ही चिंतनपर वैचारिकता मराठी ललित गद्य लेखनाची वाट अधिक रेखीव करताना दिसते·

## संदर्भ टीपा :-


१ अवचट अनिल, माणसं, मौज प्रकाशन, मुंबई, ति·आ· १९८५ प्रस्ता·· पृ·६

२ तत्रैव, पृ· ५

३ अवचट अनिल, माणसं, मौज प्रकाशन, मुंबई, ति·आ· १९८५ पृ·८

४ तत्रैव, पृ· ८९

५ तत्रैव, पृ· ९८

६ तत्रैव, पृ· १६०

७ पाटील अरूंधती, युगवाणी, दिवाळी अंक, १९८१ पृ· ४४५

८ तत्रैव, पृ· ६५

९ तत्रैव, पृ· १६५

१० तत्रैव, पृ· ८९

११ तत्रैव, पृ· १६

१२ कर्वे इरावती, परिपूर्ती, देशमुख आणि कंपनी, पुणे सा·आ· १९६९ पृ· २५

१३ अवचट अनिल, माणसं, मौज प्रकाशन, मुंबई, ति·आ·१९८५ पृ· १६

१४ तत्रैव, पृ· ४५

१५ तत्रैव, पृ· ६५

१६ तत्रैव, पृ· १००

१७ तत्रैव, पृ· १७९

१८ सोमण अंजली, ललित, जून १९९० पृ· ५१

१९ अवचट अनिल, माणसं, मौज प्रकाशन, मुंबई, ति·आ १९८५ पृ· ९८

२० तत्रैव, पृ· १०६

२१ तत्रैव, पृ· २०

२२ तत्रैव, पृ· ३१

२३ तत्रैव, पृ· १३१

२४ तत्रैव, पृ· १६३

२५ तत्रैव, पृ· ७४

२६ तत्रैव, पृ· ८५

२७ आहेर कमल, साहित्यसूची, जुलै १९८४ पृ· ३८

२८ अवचट अनिल, माणसं, मौज प्रकाशन, मुंबई, ति·आ १९८५पृ·७७

२९ तत्रैव, पृ·८५

३० तत्रैव, पृ· ४

३१ तत्रैव, पृ· ४

३२ तत्रैव, पृ· ८२, ८३

३३ तत्रैव, पृ· १६५

३४ आहेर कमल, साहित्यसूची, जुलै १९८४ पृ·४०

३५ अवचट अनिल, माणसं, मौज प्रकाशन, मंबई, ति·आ १९८५ पृ·२

३६ तत्रैव, पृ·५

३७ तत्रैव, पृ·२०

३८ तत्रैव, पृ·२६

३९ तत्रैव, पृ·२७

४० तत्रैव, पृ·६०

४१ तत्रैव, पृ·६४

४२ तत्रैव, पृ·६५

४३ तत्रैव, पृ·९४

४४ तत्रैव, पृ·१४९, १५०

४५ तत्रैव, पृ·१५२

४६ तत्रैव, पृ·४५

४७ तत्रैव, पृ·९१

४८ तत्रैव, पृ·१४३

४९ तत्रैव, पृ·१५

५० तत्रैव, पृ·२

५१ तत्रैव, पृ·२

५२ तत्रैव, पृ· ३

५३ तत्रैव, पृ· ९

५४ तत्रैव, पृ· १६

५५ तत्रैव, पृ· ६९

५६ तत्रैव, पृ· ६०

५७ तत्रैव, पृ· २२

५८ तत्रैव, पृ· २

५९ तत्रैव, पृ· ४१, ४२

६० तत्रैव, पृ· १६०

६१ सोमण अंजली, ललित, जून १९९० पृ· १४